# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२४**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यास न्यायालयाला मंजूरी मिळूनही अद्याप याबाबत अंमलबजावणी झालेली नसल्याबाबत

**(१) ५३३२३ (२९-०१-२०२३). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि.पालघर) तालुक्याच्या निर्मितीत मागील २३ वर्षापासून न्यायालयाला मंजूरी मिळूनही अद्याप याबाबत अंमलबजावणी झाली नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिड लाख लोकसंख्या असलेल्या तालुक्याला न्यायालयीन मंजूरी मिळूनही त्यावर अंमलबजावणी होण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त ठिकाणी स्वतंत्र न्यायालय होण्याच्या अद्याप प्रतिक्षेत असल्यामुळे येथील नागरिकांना जव्हार, वाडा, किंवा भिवंडी येथील न्यायालयावर अवलंबून रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त ठिकाणी स्वतंत्र न्यायालयाला मंजूरी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०१-२०२४) :** (१) विक्रमगड (जि.पालघर) येथे २३ वर्षापासून न्यायालयाला मंजूरी मिळाल्याची बाब खरी नाही. तथापि, दि.२८/१०/२०२१च्या पत्रान्वये विक्रमगड (जि.पालघर) येथे ग्राम न्यायालय स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव मा. उच्च न्यायालयाकडून शासनास प्राप्त झाला असून त्यावर शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(२) उपरोक्त अ.क्र.१ येथील उत्तराच्या अनुषंगाने प्रश्न उद्भवत नाही.

(३) सध्या जव्हार येथे ग्रामन्यायालय कार्यरत असून दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, जव्हार हे त्या न्यायालयाचे न्यायाधिकारी म्हणून काम पहात आहेत. सद्य:स्थितीत प्रस्तावित विक्रमगड ग्रामन्यायालयाच्या कक्षेतील प्रकरणे दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, जव्हार या न्यायालयात चालवली जात आहेत.

(४) विक्रमगड येथे ग्रामन्यायालय स्थापन करण्याबाबतच्या प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामपंचायती व 'क' वर्ग नगरपरिषद, नगरपंचायती सार्वजनिक पाणीपुरवठा व पथदिव्यांच्या देयकापोटीची थकबाकी राज्य शासन ''वन टाईम सेटलमेंट'' म्हणून महावितरणला अदा करणार असल्याबाबत

**(२) ५९४०३ (२५-०४-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ)**

(१) राज्यातील ग्रामपंचायती व 'क' वर्ग नगरपरिषद, नगरपंचायती सार्वजनिक पाणीपुरवठा व पथदिव्यांच्या देयकापोटीची ३० जून, २०२२ पर्यंतची थकबाकी राज्य शासन ''वन टाईम सेटलमेंट'' म्हणून महावितरणला अदा करणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ०१ जुलै, २०२२ रोजी पासूनची देयके संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी १५ व्या वित्त आयोग अथवा अर्थसंकल्पीय तरतुदीतून भरावेत अशा स्पष्ट सुचना शासनाकडून देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निर्णयाच्या अनुषंगाने महावितरणच्या थकबाकीची एकूण रक्कम किती आहे व अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०१-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) ग्रामविकास विभागाच्या पथदिव्यांची माहे मार्च २०२३ ची एकूण थकबाकी रु. ५५६६ कोटी व सार्वजनिक पाणीपुरवठाची माहे मार्च २०२३ ची एकूण थकबाकी रु. २३४२ कोटी इतकी आहे. तसेच नगरविकास विभागाची पथदिव्यांची माहे मार्च २०२३ ची एकूण थकबाकी रु. ४३५ कोटी व सार्वजनिक पाणीपुरवठाची माहे मार्च २०२३ ची एकूण थकबाकी रु.६७४ कोटी इतकी आहे.

ग्रामविकास विभागाकडून पथदिव्यांच्या मूळ मुद्दलापोटी रु. ३,३९१ कोटी अर्थसंकल्पीत करुन अदा करण्यात आले आहेत. ग्रामविकास विभागामार्फत पाणीपुरवठा योजनांच्या मूळ मुद्दलापोटी रु. ११३६ कोटी अर्थसंकल्पीत करुन निधी वितरीत करण्याची कार्यवाही चालू आहे. नगरविकास विभागामार्फत देय असणारी मूळ मुद्दलापोटी रू. १८६ कोटीची पुरवणी मागणी मंजूर करण्यात आली आहे व निधी वितरीत करण्याची कार्यवाही चालू आहे.

---

## जलसंधारण विभागाने नदीच्या पाणी दरांमध्ये केलेली दरवाढ

**(३) ६१०८५ (०८-०५-२०२३). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या जलसंधारण विभागाने नदीतील पाण्याचे दर वाढविले असल्याचे दिनांक ०९ जुलै, २०२२ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले होते हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या या दरवाढीमुळे कोल्हापूर महानगरपालिकेला आर्थिक बोजा सहन करावा लागणार असून पाणी दरामध्ये दुपटीने वाढ झाल्यास त्याचा परिणाम सामान्य नागरिकांना पाणीपट्टीच्या करांमध्ये वाढ होणार असल्याने आर्थिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त दारवाढीच्या निर्णया मुळे औद्योगीक पाणीधारकांचे नुकसान होणार असल्याने व्यापारी यांनाही आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जलसंपदा विभागाने ही पाणी दरवाढ तातडीने मागे घेऊन सर्व समान्यांना परवडेल असे व स्थानिक महानगरपालिका यांच्या तिजोरीवरील पडणारा अतिरिक्त भार कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१२-२०२३) :** (१) होय. हे अंशत: खरे आहे.
महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांच्या दि.२९/०३/२०२२ च्या आदेशान्वये दि.१ जुलै, २०२२ पासून सिंचन व बिगरसिंचन पाण्याचे दर वाढविणेत आलेले आहेत.
(२) व (३) अंशत: खरे आहे. शासनाच्या या दरवाढीमुळे कोल्हापूर महानगरपालिकेला आर्थिक बोजा सहन करावा लागणार आहे. तथापि, दि.९ जुलै, २०२२ नंतर कोल्हापूर महानगरपालिकेने नागरिकांच्या पाणीपट्टी करामध्ये, औद्योगिक पाणीधारकांच्या तसेच व्यापारी यांचे पाणीपट्टीच्या करामध्ये कोणतीही वाढ केलेली नसल्याने सामान्य नागरिक, औद्योगिक पाणीधारक व व्यापारी यांच्यावर कोणताही आर्थिक बोजा सद्य:स्थितीत नाही.
(४) राज्यातील कृषी, सिंचन, घरगुती व औद्योगिक प्रयोजनार्थ वापरल्या जाणाऱ्या पाण्यासाठी ठोक जलदर ठरविणे, त्याचे पुनर्विलोकन व सुधारणा याबाबत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण नियम २००५ नुसार महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण गठीत करण्यात आले आहे. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने ठोक जलदारामध्ये केलेली वाढ ही सध्याच्या महागाईचा विचार करुन तसेच महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ मधील कलम ११ (घ) नुसार सिंचन व्यवस्थापनाच्या प्रशासकीय कार्यचालन व परिरक्षणाच्या संपूर्ण खर्चाची वसुली परावर्तीत होईल

अशा तऱ्हेने पाणीपट्टीदर निश्चित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्हयातील पेण शहराच्या बाजूला असलेल्या आंबेघर धरणातून पेण शहराकरीता १०० टक्के पाणी राखून ठेवण्याबाबत.

**(४) ६१९०३ (२५-०४-२०२३). श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील पेण शहराकरीता भोगावती नदीतून पाणी पुरवठा केला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहराचा मोठया प्रमाणावर विस्तार झाल्यामुळे पाण्याच्या पुरवठयावर मर्यादा येत असल्याने दुसरा पर्याय म्हणून आंबेघर धरणातील १०० टक्के पाणी मिळाल्यास शहराकरीता सुरळीत पाणी पुरवठा करणे शक्य होईल, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, पेण शहराच्या बाजूला असलेल्या आंबेघर धरणातून पेण शहराकरीता १०० टक्के पाणी राखून ठेवण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २८ जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, यांच्यकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय.

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्य अनुषगांने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०२३) :** (१) होय

(२) होय

(३) होय

स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. उपमुख्यमंत्री यांना उद्देशून दिनांक २८/०७/२०२२ रोजी लेखी निवेदनद्वारे मागणी केली आहे.

(४) सदर आरक्षण प्रस्ताव हा विहित कागदपत्रांसह प्राप्त होणे आवश्यक असल्याने याबाबत मुख्याधिकारी, पेण नगरपरिषद, पेण यांना कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड या कार्यालयाचे दि. ०७/०६/२०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. प्रस्ताव विहित कागदपत्रांसह प्राप्त होताच मंजुरीसाठी शासनास सादर करण्याचे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तिन्ही विज कंपनीतील तांत्रिक कामगारांना आर्थिक भार नसलेली स्वतंत्र वेतनश्रेणी लागू करण्याबाबत

**(५) ६२५१५ (३०-०४-२०२३). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिन्ही विज कंपनीतील तांत्रिक कामगारांना आर्थिक भार नसलेली स्वतंत्र वेतनश्रेणी लागू करणेबाबत प्रधान सचिव (ऊर्जा) यांना सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा अहवाल शासनाने सादर केला आहे काय, अहवालाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदरचा अहवाल सद्यस्थितीत शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कार्यकारी अभियंता महावितरण कंपनी मनमाड (जि.नाशिक) यांच्या अधिपत्याखाली असलेल्या महावितरण मधील कंत्राटी तंत्रज्ञांना बेकायदेशीरपणे कामावरून कमी केल्याबाबत**

**(६) ६४७०० (२८-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कार्यकारी अभियंता महावितरण कंपनी मनमाड (जि.नाशिक) यांचे अधिपत्याखाली दोन वर्षापेक्षा अधिक काळापासून कार्यरत असणाऱ्या १६ कंत्राटी तंत्रज्ञ कामगारांना माहे एप्रिल, २०२३, पासून अनधिकृतपणे कमी केल्यामुळे त्यांना पूर्ववत कामावर घेण्यासाठी कामगार उपायुक्त, नाशिक विभाग यांनी दिनांक २१ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास मुख्य अभियंता महावितरण यांना निर्देश दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कंत्राटी तज्ञ कामगारांना पूर्ववत कामावर घेण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१२-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे. मनमाड विभागामध्ये माहे एप्रिल, २०२३ मध्ये विहीत शैक्षणिक अर्हता नसल्यामुळे १६ बाह्यस्त्रोत कामगारांना कमी करण्यात आलेले आहे. औद्योगिक न्यायालयात यापूर्वी Reference (IT)-०२/२०२३ नुसार मनमाड विभागात कमी करण्यात आलेल्या बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांनी समेट प्रकरण दाखल केले आहे. सदर समेट प्रकरणात वरील १६ बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. ज्या बाह्यस्त्रोत कंत्राटी कामगांराकडे परिपत्रक दि.२३.२०.२०१९ अन्वये विहीत पदांकरीता शैक्षणिक अर्हता नाहीत अशा कंत्राटी कामगारांना एक विशेष बाब म्हणून विहीत शैक्षणिक अर्हता प्राप्त करण्यासाठी ३ वर्षाचा कालावधी परिपत्रक दिनांक १.९.२०२३ अन्वये देण्यात आले असून तशा सुचना क्षेत्रिय कार्यालयांना दिलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात क्राउड फंडिंग च्या नावाखाली आर्थिक गैरव्यवहाराचे प्रमाण वाढले असल्याबाबत**

**(७) ६५०५० (२८-०८-२०२३). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) गरजू रूग्णांच्या वैद्यकीय उपचारांना ऑनलाइन पैसे पाठवून मदत करावी असे आवाहन करणाऱ्या विविध वेबसाइट तसेच सामाजिक माध्यमांद्वारे केल्या जाणाऱ्या क्राउड फंडिंगच्या आवाहनांमुळे आर्थिक गैरव्यवहारांचे प्रमाण वाढले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा क्राउड फंडिंग वेबसाइट्स वर कोणत्याच विभागाचे अंकुश नसल्यामुळे याबाबत कोणतीही नियमावली नसल्याचे समजते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बनावट बिलांच्या आधारे किंवा बऱ्याचदा रूग्णाला डिस्चार्ज दिला गेल्या नंतरही मदतीचे कॅम्पेन सुरू ठेवले जात असून क्राउड फंडिंग घेतले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अशाप्रकारे होणाऱ्या गैरव्यवहार व अनियमिततेची नियमावली तयार करण्याकरिता समिती स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच क्राउड फंडिंग च्या नावाखाली आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०२४) :** (१),(२),(३)

Impact Guru कंपनी/वेबसाईट चॅनेल वर व्हिडीओद्वारे बालकाचे आजारी असलेल्या व्यंगतेचे फोटो प्रदर्शन

करुन त्याच्या आईच्या मार्फत भिक मागण्यासाठी उत्तेजन देऊन त्याचा भिक मागण्यासाठी उपयोग करुन गैरकायदेशिर रित्या क्राउड फंडिंग बाबत पोलीस स्टेशन सोनखेड, जिल्हा नांदेड येथे गु.र.नं. ११२/२०२३ गुन्हा दाखल आहे.

तसेच बाई जेरबाई वाडिया हॉस्पिटल, मुंबई येथिल वय वर्ष ४ असलेल्या दोन पेशंटची ओपन हार्ट सर्जरी करावयाची आहे म्हणून बेकायदेशीर रित्या जस्ट अ कॉल या नावाच्या कॉल सेंटरवरुन कॉल करुन ऑनलाईन पैसे घेऊन फसवणूक करत असल्याबाबत आचोळा पोलीस स्टेशन, मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय येथे गु.र.नं. २७७/२०२२ गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यांचा तपास सुरु आहे.

(४) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या दि.२९.०५.२०२३ च्या शासन निर्णयान्वये गरजू रुग्णांच्या उपचारावरील खर्च Crowd Funding माध्यमातून भागविण्यासंबंधी नियमावली/कार्यपध्दती तयार करण्याबाबत आयुक्त वैद्यकीय शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### महावितरणसह ऊर्जा विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(८) ६५०८८ (२८-०८-२०२३). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरणसह ऊर्जा विभागातील रिक्त ३६ हजार पदांची भरती केली जाईल, असे आश्वासन देऊन सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ होऊन देखील अद्यापही रिक्त पदे भरण्याबाबत जाहिरात निघाली नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक विभागामध्ये रिक्त असणाऱ्या जागांची भरती करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कायआहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१२-२०२३) :** (१) व (२) ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या कंपन्या तसेच शासकीय कार्यालयात सद्यस्थितीत एकूण ३०९३० पदे रिक्त असून १३०५६ पदे भरण्यात आलेली आहेत. रिक्त पदांपैकी एकूण ४३३८ पदांकरिता जाहिरात प्रकाशित केली असून उर्वरित रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सुकापूर व कोन (ता.पनवेल, जि.रायगड) या गावात ऑर्केस्ट्राच्या नावाखाली लेडिजबार/डान्सबार रात्री उशिरापर्यंत सुरू असल्याबाबत

**(९) ६५१५८ (२७-०९-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुकापूर व कोन (ता.पनवेल, जि.रायगड) या गावात ऑर्केस्ट्राच्या नावाखाली लेडिजबार/डान्सबार रात्री उशिरापर्यंत सुरू असल्याचे माहे मे, २०२३, मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑर्केस्टाच्या नावाखाली सुरू असलेले लेडीजबार / डान्सबारमुळे होणा-या ध्वनीप्रदुषणामुळे नागरिकांना त्रास होत असून महिला वर्गात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विभागातील पोलीसांच्या दुर्लक्षामुळे सदर डान्सबार रात्री उशिरापर्यंत सुरू आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदरचे सुरू असलेले बार तातडीने बंद करून दुर्लक्ष करणा-या संबंधित पोलीस अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही.
तथापि, मे २०२३ मध्ये नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हद्दीत ०२ ऑर्केस्ट्राबार आस्थापनामधील महिला गायक भडक वेशभूषा करुन ग्राहकांशी बिभत्स वर्तन करत असल्याने पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे गु.र.नं १३०/२०२३ व गु.र.नं १३२/२०२३, भा.दं.वि. कलम २९४,३४ अन्वये अनुक्रमे दिनांक १८/०५/२०२३ व दिनांक २०/०५/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही.
याबाबत नागरिकांकडून कोणत्याही प्रकारच्या तक्रारी प्राप्त नाहीत. नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत परिमंडळ-२ मधील सर्व ऑर्केस्ट्रा बार आस्थापनांना सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ध्वनीरोधक प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे.
(३) हे खरे नाही.
(४) नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिक्षेत्रातंर्गत पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील नियमभंग करणाऱ्या ऑर्केस्ट्रा आस्थापनेविरुद्ध सन २०२३ मध्ये ०९ दखलपात्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच ०३ ऑर्केस्ट्राबारचे परवाने १० दिवसांकरिता निलंबित व ०१ ऑर्केस्ट्राबारचा परवाना कायमस्वरुपी रद्द करण्यात आलेला आहे. यासंदर्भात पोलीस अधिकारी यांचेकडून कोणत्याही प्रकारे कर्तव्यात कसूर करण्यात आलेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिगांव प्रकल्पांच्या लाभ क्षेत्रामध्ये खामगांव तालुक्यातील उर्वरीत गावांचा समावेश करण्याबाबत.**

**(१०) ६५४७५ (०३-०९-२०२३). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगांव तालुका हा अवर्षणग्रस्त तालुका असून या भागातील शेतकरी हे कोरडवाहू शेती करतात हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांचा सिंचनाचा व शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी खामगांव तालुक्यातील गांवाचा समावेश जिगांव प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रात समावेश करण्याबाबतची मागणी माहे मे, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता, जिगांव प्रकल्पाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, जिगांव प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रात खामगांव तालुक्यातील उर्वरीतगावांचा समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०१-२०२४) :** (१) होय.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## टागोर नगर विक्रोळी (पुर्व) येथील महालक्ष्मी शिक्षण संस्था संचलित विक्रोळी विद्यामंदिर हायस्कुल या शाळेच्या मालमत्तेच्या पुनर्विकासात झालेला गैरव्यवहार

**(११) ६६२०५ (०१-०९-२०२३). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टागोर नगर विक्रोळी (पुर्व) येथील महालक्ष्मी शिक्षण संस्था संचलित विक्रोळी विद्यामंदिर हायस्कुल या शाळेसाठी म्हाडाने दिलेल्या मालमत्तेच्या पुनर्विकासामध्ये संचालक मंडळानी आर्थिक गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करून संस्थेचे संचालक मंडळ बरखास्त करून संस्थेवर प्रशासक नियुक्त करण्याची करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १८ एप्रिल,२०२३ रोजी वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०१-२०२४) :** (१) व (२) विषयांकीत संस्थेच्या संचालक मंडळाने शाळेसाठी म्हाडाने दिलेल्या मालमत्तेच्या पुनर्विकासामध्ये आर्थिक गैरव्यवहार केल्याच्या आरोपामुळे संस्थेवर प्रशासक नेमण्यासाठी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली, ही बाब खरी आहे.

(३) सदर दि.१८.०४.२०२३ रोजीचा अर्ज सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई या कार्यालयास कार्यवाही करीता पाठविण्यात आलेला असून, सदर अर्जाबाबत सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई यांचे कार्यालय, निरिक्षक चौकशी क्र. २६/२०२३ अन्वये चौकशी प्रलंबित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दिवे, नायगाव, पोंढे, राजूरी, माळशिरस व पुरंदर (ता.पुरंदर, जि.पुणे) परिसरातील शेतकऱ्यांना उपसा जलसिंचन योजनेचा लाभ देणेबाबत

**(१२) ६६३११ (१०-१०-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिवे, नायगाव, पोंढे, राजूरी, माळशिरस व पुरंदर (ता.पुरंदर, जि.पुणे) परिसरात पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली असल्याचे माहे मे, २०२३ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेत पाणीवाटपात नियोजन शुन्यता व योजनेत वारंवार होणा-या तांत्रिक बिघाडामुळे शेतक-यांना वेळेवर पाणी मिळत नसल्याने पिके जळून जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर परिसरातील शेतकऱ्यांकडून पुरंदर उपसा जलसिंचन योजनेच्या पाण्याची वारवांर मागणी करुनही त्यांना पाणी मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन, त्यानुषंगाने पाण्याचे नियोजन करुन शेतक-यांना शेतीसाठी वेळेवर पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१२-२०२३) :** (१) होय.
(२) (३) व (४) हे खरे नाही.
पुरंदर उपसा सिंचन योजनेद्वारे माहे मे, २०२३ मध्ये दिवे व परिसरातील मायनर २,३,४,५ व ६ वितरीकेद्वारे दि.१३ मे, २०२३ ते दि.२७ मे, २०२३ या दरम्यान ७ Mcft पाणी देण्यात आलेले आहे. नायगाव व माळशिरस परिसरात मायनर-१४, मायनर-८, सबमेन-१ याद्वारे दि.८ मे, २०२३ ते दि.११ मे, २०२३ या दरम्यान ४ Mcft पाणी देण्यात आलेले आहे. तसेच पोंढे व राजुरी या परिसरात New Line-१,२,३ व मायनर-१६ या वितरीकांद्वारे दि.४ मे, २०२३ ते दि.१६ मे, २०२३ दरम्यान ६ Mcft पाणी देण्यात आलेले आहे. नियोजनाप्रमाणे तसेच शेतकऱ्यांच्या मागणीप्रमाणे वेळोवेळी पुरंदर उपसा सिंचन योजनेतून आवर्तन देण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### उरळी कांचन (ता. हवेली, जि.पुणे) येथील विजेची समस्या सोडविण्याबाबत

**(१३) ६६३४९ (०१-०९-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरळी कांचन (ता. हवेली, जि. पुणे) येथील वीज उपकेंद्र नसल्याने या उपविभागात गेल्या पाच वर्षापासून विजेची समस्या कायम आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ही समस्या दूर करण्यासाठी महावितरणाने पुरंदर उपसा केंद्रातून वीजपुरवठा मिळावा यासाठी कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविला आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने तातडीने निर्णय घेऊन येथील विजेची समस्या दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही, उरुळी कांचन या परिसरात १३२ केव्ही यवत अति उच्चदाब उपकेंद्रामधून निघणाऱ्या ३३ केव्ही कोरेगाव मूळ वाहिनीमार्फत ३३/२२ केव्ही कोरेगाव मूळ उपकेंद्रास वीज पुरवठा केला जातो. तसेच, २२०/२२ केव्ही थेऊर अति उच्चदाब उपकेंद्रामधून निघणाऱ्या २२ केव्ही वळती वीज वाहिनीमार्फत वीज पुरवठा केला जातो. या परिसरातील सर्व ग्राहकांना सुरळीत व योग्य दाबाने वीज पुरवठा केला जातो.
(२) १३२/३३ केव्ही अति उच्चदाब केंद्र शिंदवणे हे जलसंपदा विभागाच्या मालकीचे असून, या उपकेंद्रातून एक पर्यायी ३३ केव्ही वीज वाहिनी ३३/२२ केव्ही कोरेगाव मूळ उपकेंद्रास उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने महावितरणमार्फत पत्रव्यवहार सुरु आहे. हा पर्याय उपलब्ध झाल्यास उरुळी कांचन परिसरात अधिक दर्जेदार वीज पुरवठा केला जाऊ शकेल.
(३) याबाबतच्या प्रस्तावास जलसंपदा विभाग, महापारेषण कंपनी व महावितरण कंपनी यांची संयुक्त मंजूरी आवश्यक आहे. याबाबत महावितरण कंपनीमार्फत जलसंपदा विभागाकडे विनंती केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जलमापक यंत्र शासनाकडून बसूवन मिळण्याबाबत

**(१४) ६६४०५ (२९-०८-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.संजय जगताप (पुरंदर),**

**श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील भोरे,वेल्हे व मुळशी हे तीन तालुके डोंगराळ असून उपसा सिंचन योजनांवर स्वखर्चाने जलमापक यंत्र बसविणे परवडणारे नसल्याने जलमापक यंत्र शासनाकडून बसूवन मिळावेत व जलमापक यंत्रामुळे झालेली दरवाढ कमी करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि. ६ मे, २०२३ रोजी वा त्या दरम्यान मा. मुख्यमंत्री यांना निवेदनाद्वारे केलीआहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१२-२०२३) :** (१) होय.

(२) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ मधील कलम ११ (घ) नुसार प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून दि.२९.०३.२०२२ च्या आदेशान्वये दि.०१ जुलै, २०२२ पासून ठोक जलदर पुनर्विलोकीत व सुधारित केलेले आहे. सदर ठोक जलदर हे घनमापन व क्षेत्र / पीक आधारित निश्चित केलेले आहे. सदर दर सिंचन व्यवस्थापनाच्या प्रशासकीय कार्यचालन व परिरक्षणाच्या संपूर्ण खर्चाची वसुली परावर्तीत होईल अशा तऱ्हेने पाणीपट्टीदर निश्चित करण्यात आले आहे. तसेच यामध्ये, खाजगी उपसा सिंचन योजनाच्या लाभार्थ्यांना स्वखर्चाने स्त्रोतांच्या जागी बंदिस्त वितरण नलिकेवर संक्रमण कालावधीत जलमापक यंत्र बसवेपर्यंत सदर आदेशातील परिशिष्ट-१ मधील मुद्दा क्र.५ मधील अटींनुसार क्षेत्राधारीत आकारणीची सवलत देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील कोरेगाव पार्क परिसरात पब सुरु असल्याबाबत**

**(१५) ६७४४२ (२७-०९-२०२३). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील कोरेगाव पार्क परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात पब सुरु असल्याचे माहे मार्च २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरेगाव पार्क येथील अनेक सोसायटीमधील लहान मुले ज्येष्ठ नागरिकांना या पब मध्ये लावण्यात येणाऱ्या साऊंड सिस्टिम मुळे त्रास होत आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पब बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन कार्यकक्षेत एकही पब नाही.

तथापि, हॉटेल्समध्ये ध्वनी प्रदूषण झाल्याबाबत मार्च, २०२३ पासून एकूण ५ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ व ध्वनी प्रदुषण (विनियमन व नियंत्रण) अधिनियम, २००० मधील नियमांचा भंग केल्याने कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन कार्यकक्षेतील एकूण १० हॉटेल्सवर कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केज (जि. बीड) तालुक्यातील को.प.बं. व गेटेड सिनबं योजनांच्या अंदाजपत्रकांना मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देणेबाबत.**

**(१६) ६७५०२ (३१-०८-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज (जि. बीड) तालुक्यातील ५० को.प.बं. व गेटेड सिनबं योजनांचे सर्वेक्षण करुन अंदाजपत्रकेसन २०२२-२३ नुसार जलसंधारण दरसूची करण्यात आलेली असून सदर योजनांचे शासन निर्धारित आर्थिक मापदंड सफल असल्यामुळे सदरील योजनांना महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ निधीतून प्रशासकीय मान्यतेसाठी सदर अंदाजपत्रके प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, औरंगाबाद यांच्याकडे सादर करण्यात आलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामांना मंजूरी देऊन निधी उपलब्ध करुन देणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री यांचेकडे दिनांक २५ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार उक्त योजनांच्या अंदाजपत्रकांना मंजुरी देण्यासह निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (२८-१२-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सदर मागणीच्या अनुषंगाने सर्वेक्षण करुन केज (जि. बीड) तालुक्यातील ५० को.प.बंधारे/ गेटेड सिमेंट बंधारे योजनांची अंदाजपत्रके तयार करुन महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ निधी अंतर्गत दि. १९.०४.२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यतेच्या कार्यवाहीसाठी अप्पर आयुक्त, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र पुणे यांना कार्यवाहीसाठी प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दक्षिण सोलापूर मतदार संघातील सिंचनाची देखभाल दुरुस्ती आणि सुधारणांची अनेक कामे शासनाकडे प्रलंबित असल्याबाबत.**

**(१७) ६७५६३ (०३-०९-२०२३). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण सोलापूर मतदार संघातील सिंचनाची देखभाल दुरुस्ती आणि सुधारणांची अनेक कामे शासनाकडे प्रलंबित असल्याने येथील शेतकऱ्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री महोदयांना स्वंयस्पष्ट निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, भीमा नदी (वडापूर-बेगमपूर) ते सीना नदी (शिंगोली-अकोली) दरम्यान जोड कळवा करणे, उत्तर दक्षिण सोलापूरचा कायमस्वरुपी दुष्काळी भागात अंशत: सिंचन सुविधा उपलब्ध करणे, भीमा व सीमा नदीला येणाऱ्या पुरामुळे नदीकाठच्या गावातील रहिवाशांची दरवर्षी पुरामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी या गावांना पुर संरक्षण कामांचे प्रस्ताव मागविणे, भीमा व सीमा नदीवरील कोल्हापूर पद्धतीचे दगडी बांधकामातील दगडी बंधाऱ्यातुन होणारी पाणी गळती थांबविण्यासाठी काँक्रिटीने दुरुस्त करुन नवीन लोखंडी बर्गे पुरवठा करणे, शाखा कालवे वितरीका यावरील शीर्षाद्वारे बांधकामे तसेच लोखंडी उलांडे पुल यांची दुरुस्ती करणे, देगाव कालवा जलसेतूची उर्वरित काम जून अखेर पूर्ण करणे, खरीप हंगामात शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ देणे, अशी अनेक कामे शासनाकडे प्रलंबित आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन उक्त प्रलंबित कामे करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे,
(३) भीमा नदी (वडापूर-बेगमपूर) ते सीना नदी (शिंगोली-अकोली) दरम्यान जोड कळवा करणे - उजनी प्रकल्पाच्या सुधारीत फेर जलनियोजनात भीमा सीना नदी जोड कालव्याच्या ०.५११ टिएमसी (१४.४७ दलघमी) पाणी वापराचा समावेश करून त्यास शासनाची मान्यता घेणे आवश्यक असल्याने भीमा (उजनी) प्रकल्पाच्या पाणी वापराबाबत सुधारीत फेर जलनियोजन प्रस्तावाची कार्यवाही शासनस्तरावर प्रगती पथावर आहे.
• उत्तर व दक्षिण सोलापूरचा कायमस्वरूपी दुष्काळी भागात अंशत: सिंचन सुविधा उपलब्ध करणे -
शिरापूर उपसा सिंचन योजना ( ६०%)
एकरूख उपसा सिंचन योजना
भीमा (उजनी) प्रकल्पांतर्गत देगांव शाखा कालवा वरील योजना सिंचन क्षेत्रास लाभ देण्यासाठी प्रस्तावित आहे. या योजनांची संकल्पने व अंदाजपत्रके मंजूरी कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
• भीमा व सीना नदीला येणाऱ्या पुरामुळे नदीकाठच्या गावातील रहिवाशांची दरवर्षी पुरामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी या गावांना पुर संरक्षण कामांचे प्रस्ताव मागविणे- सोलापूर जिल्ह्यातील भीमा नदी व सीना नदीवरील पूररेषा निश्चित करणेच्या अंदाजपत्रकांस तांत्रिक मान्यता प्राप्त असून निविदा तयार करण्याचे काम क्षेत्रिय स्तरावर प्रगती पथावर आहे.
• भीमा व सीमा नदीवरील कोल्हापूर पध्दतीचे दगडी बांधकामातील दगडी बंधाऱ्यातुन होणारी पाणी गळती थांबविण्यासाठी काँक्रिटीने दुरूस्त करणे - सद्यस्थितीत सीना नदीवरील पाकणी, शिंगोली, अकोले (मं), नंदूर वडकबाळ, सिंदखेड, कोर्सेगाव, बंदलगी कोल्हापूर पध्दतीचे दगडी बंधाऱ्यातून होणारी पाणी गळती थांबविण्यासाठी स्तंभाचे काँक्रीटींग करण्याचे ₹१५८५.५० लक्ष इतक्या किंमतीचे काम विशेष दुरूस्ती अंतर्गत नियाम मंडळाची मान्यता घेण्याकरीता प्रस्तावित केले आहे. तसेच जवळगाव मध्यम प्रकल्प (₹९४५.०० लक्ष), हिंगणी मध्यम प्रकल्प (₹८४६.०० लक्ष) व को.प.बंधारा पोटेगाव (₹४१२.९१ लक्ष) या दुरूस्तीचा प्रस्ताव नियामक मंडळाची मान्यतेसाठी सादर केला आहे.
• नवीन लोखंडी बर्गे पुरवठा करणे -बंधाऱ्यावर बर्गे पुरवठा करण्याचे कामाचा समावेश पाखरण कार्यक्रम सन २०२३-२४ मध्ये करण्यात आला आहे. सद्य:स्थितीत सरळ प्रकारातील २०० लोखंडी बर्गे को.प.बंधारा बंदलगी येथे स्थलांतरीत करण्यात आलेले आहेत.
• शाखा कालवे वितरीका यावरील शीर्षाद्वारे बांधकामे - उन्हाळा हंगाम २०२२-२३ मध्ये दक्षिण सोलापूर मतदारसंघातील कुरूल शाखा कालव्याच्या पुच्छ भागातील लघुवितरीका क्र.२५ व २६ द्वारे मंद्रुप व बसवनगर येथील शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ दिला आहे. कुरूल शाखा कालवा किमी ५० ते ६० स्वच्छतेचे काम पूर्ण झाले आहे. सद्यस्थितीत कुरूल शाखा कालवा लघुवितरीका क्र.२६ चे काम प्रगतीपथावर आहे.
• लोखंडी उलांडे पुल यांची दुरूस्ती करणे - दक्षिण सोलापूर मतदार संघातील येणाऱ्या कालव्यावरती नवीन लोखंडी उलांडे पूल तयार करणे किंवा दुरूस्ती करणे याबाबतची मागणी प्राप्त नाही.
• देगांव शाखा कालवा जलसेतूची उर्वरित कामे जून अखेर पूर्ण करणे - देगांव शाखा कालव्यावरील कि.मी. १ ते २६ मधील मातीकाम व बांधकाम जवळपास पूर्ण झाले आहे. कि.मी. २ व ४ मधील जलसेतूचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित लांबीसाठी देगाव उपसा सिंचन योजना प्रस्तावित आहे. या उपसा सिंचन योजनेच्या शिर्ष कामांची निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.
• खरीप हंगामात शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ देणे - प्रकल्प नियोजनानुसार तसेच पाण्याची उपलब्धता तपासून कालवा सल्लागार समितीच्या बैठकीतील निर्णयानुसार खरीप हंगामात शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ देण्यात येतो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डहाणू तालुक्यातील ( जि.पालघर ) कासा येथे बैलांची चोरी झाल्याबाबत

**(१८) ६७७५१ (२७-०९-२०२३). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कासा (ता.डहाणू, जि.पालघर) येथे बैलांची चोरी करुन पळणा-या चोरटयांना अटकाव करणा-या गोरक्षकांवरच दगड व तलवारीने हल्ला केल्याप्रकरणी डहाणू पोलिस ठाण्यात चार व्यक्तींविरुध्द दिनांक २५ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाठलाग करणा-या गोरक्षकांच्या गाडयांना अडथळा निर्माण करण्यासाठी ट्रकमधुन एका बैलाला रस्त्यावर फेकून दिल्याने सदरहू बैलाचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी गुन्हा दाखल होऊन देखील अद्यापपर्यंत चोरटयांना अटक करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने चोरटयांना अटक करुन मृत पावलेल्या बैलाच्या मालकांला नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-१२-२०२३) :** (१) होय. सदर प्रकरणी डहाणू पोलीस ठाणे येथे गु. र. नं. १२३/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३८२, ४२९, ४२७, ३३६, ५०४,५०६,३४ सह शस्त्र अधि.,१९५९ चे कलम ४,२७(२) सह प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधि.१९६० चे कलम ११(१)(घ)(ड) सह म.पो.अधि., कलम ३७(१),१३५ प्रमाणे दि.२४.०५.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) होय.

(३) हे खरे नाही. सदर गुन्ह्यातील आरोपी मोहम्मद उद्दीन, प्रमोद शर्मा व अरबाज मिशाल यांना अटक करण्यात आली आहे. एक आरोपी फरार असून त्याचा तपास करण्यात येत आहे.

(४) मृत पावलेल्या बैलाच्या मालकाचा शोध घेण्यात आला परंतू ते मोकाट जनावर असल्याचे निष्पन्न झाल्याने नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाघेबाभुळगाव, ता. केज, जि. बीड. येथील म.प्र.चे विशेष दुरुस्ती बाबत.

**(१९) ६७७५३ (१४-०९-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाघेबाभुळगाव, (ता. केज, जि. बीड) येथील मध्यम प्रकल्पाच्या विशेष दुरुस्तीच्या कामाला शासनाने प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. परंतु GST व नवीन दरसूची सन २०२२-२३ मधील झालेल्या बदलामुळे सदरील कामाची किंमत रु. २.२१ कोटी वरून रु. २.६२ कोटी एवढी झाली असून सदरचे वाढीव सुधारित अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी प्रादेशिक कार्यालयास सादर करण्यात आले आहे. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या कामाची सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या किंमतीस निविदा काढण्याची व खर्च करण्याची परवानगी देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी अधीक्षक अभियंता, प्रशासक, व लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड. यांचेकडे दिनांक. ०३ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देऊन प्रशासकीय मान्यतेच्या किंमतीत निविदा काढण्याची व खर्च करण्याची परवानगी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

वाघेबाभुळगाव मध्यम प्रकल्पाच्या विशेष दुरुस्तीच्या कामाला, शासन निर्णय दि.२२/०७/२०२२ अन्वये रु.२.२१ कोटी

किंमतीस प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर कामाचे मुळ अंदाजपत्रक जलसंपदा विभागाची दरसुची सन २०२१ - २२ नुसार व GST १२ % प्रमाणे तयार करण्यात आले होते. परंतू दरम्यानच्या काळात दि.०१.०६.२०२३ पासुन जलसंपदा विभागाची दरसुची सन २०२२ - २३ लागु झालेली असल्यामुळे व GST (१८%) ने वाढल्यामुळे सदर कामाच्या मुळ प्रशासकीय मान्यता किमतीपेक्षा अंदाजपत्रकीय किंमतीत वाढ झाली आहे.
(२) होय, हे खरे आहे.
निवेदनातील मागणीनुसार कार्यवाही झाली असून निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.
(३) सदर अंदाजपत्रकीय किंमतीत वाढ झाल्यामुळे निविदा प्रक्रिया करण्यासाठी सु.प्र.मा. करणे अनिवार्य होते. परंतू सु.प्र.मा. प्रक्रियेत होणारा कालापव्यय टाळण्यासाठी, सु.प्र.मा. मिळेपर्यंत प्रशासकीय मान्यता किंमतीच्या मर्यादेत निविदा काढण्याची व प्रशासकीय मान्यता रकमेच्या मर्यादेत खर्च करण्याची परवानगी मिळण्याबाबतच्या प्रादेशिक कार्यालयाकडून प्राप्त प्रस्तावास, महामंडळ कार्यालयाचे पत्र दि.११/०४/२०२३ नुसार मान्यता देण्यात आलेली असुन सदर कामाची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केज (जि. बीड) तालुक्यासाठी नवीन उपविभागाला मंजुरी देण्याबाबत

**(२०) ६७९२५ (१४-०९-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज (जि. बीड) तालुक्यासाठी महावितरणचा एक उपविभाग असून देखीन केज तालुका भौगोलिक दृष्ट्या मोठा असल्याने शहरासह तालुक्यात वीज ग्राहक संख्या मोठी आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केज येथे आणखी एका नवीन उपविभागाला मंजुरी देणे बाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उर्जा मंत्री यांचेकडे दिनांक ६ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारस निवेदनाद्वारे मागणी केली आहे. हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०२४) :** (१) व (२) लातूर परिमंडळातील बीड मंडळांतर्गत केज हा उपविभाग येतो. सद्यस्थितीत केज उपविभागाची वीज ग्राहक संख्या ४६,२४५ इतकी आहे.
केज येथे नवीन उपविभाग मंजुरी देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.२८.०२.२०२३ रोजीच्या निवेदनाद्वारे मागणी केली आहे.
(३) महावितरण कंपनीच्या निकषानुसार, उपविभागीय कार्यालय विभाजनाकरिता ६०,००० इतकी तर नवीन उपविभागीय कार्यालय निर्मितीकरिता ३०,००० किंवा त्यापेक्षा जास्त वीज ग्राहक संख्या असणे आवश्यक आहे.
सद्यस्थितीत, केज उपविभागीय कार्यालय महावितरण कंपनीच्या ग्राहक मानंकाप्रमाणे ग्राहक संख्येचा निकष पुर्ण करीत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## निम्न वर्धा प्रकल्पअंतर्गत (ता.तिवसा, जि.अमरावती) नविन पुनर्वसित गावठाणेमधील दुर्गवाडा व धारवाडा येथील प्रकल्पग्रस्तांची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(२१) ६७९४६ (०३-०९-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती**

**प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निम्न वर्धा प्रकल्पअंतर्गत (ता.तिवसा, जि.अमरावती) नविन पुनर्वसित गावठाणेमधील दुर्गवाडा व धारवाडा येथील प्रकल्पग्रस्तांच्या मागणीनुसार मंजूर केलेली कामे अद्यापही अपूर्णावस्थेत असल्याचे माहे मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी उर्वरीत अपूर्णावस्थेत असलेली कामे दर्जेदार होणेबाबत स्थानिक प्रकल्पग्रस्तांसह लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास कार्यकारी अभियंता निम्न वर्धा प्रकल्प विभाग, वर्धा यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्तांची पुनर्वसित गावठाण मधील दुर्गवाडा व धारवाडा येथील उर्वरित कामे दर्जेदार होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०१-२०२४) :** (१) नाही,

या कार्यालयाच्या अधीनस्त निम्न वर्धा प्रकल्पातंर्गत दुर्गवाडा येथील बाधीत २१८ कुटुंबाचे पुनर्वसन दुर्गवाडा-आलवाडा या पुनर्वसीत गावठाणात करण्यात आलेले आहे. तसेच धारवाडा येथील बाधीत १८८ कुटुंबाचे पुनर्वसन धारवाडा या गावठाणात करण्यात आलेले आहे. सदर पुनर्वसित गावठाणात प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन अधिनियम १९९९ नुसार १८ नागरी सुविधा पुरविण्यात आलेल्या असुन सर्व नागरी सुविधेची कामे पुर्ण झालेली आहे. त्यापैकी १३ नागरी सुविधा या जिल्हा परिषद अमरावती यांचेकडे पत्र क्र.पुनर्व/तलाठी/कावि-१२६२/२०२२ दि.३०/०८/२०२२ नुसार हस्तांतरित करण्यात आलेल्या आहेत. तसेच उर्वरित नागरी सुविधा या देखभाल दुरूस्ती अंतर्गत नुतनीकरण करून हस्तांतरण करण्याचे नियोजित आहे.

(२) होय,

(३) दुर्गवाडा-आलवाडा व धारवाडा येथील नागरी सुविधा दर्जेदार पुनर्वसन अंतर्गत करण्यासाठी विभागीय कार्यालयाचे प्राप्त पत्र क्र.२१९७/ ताशा/ नि.व.प्र/ २०२१, दि.१४/१०/२०२१ नुसार दर्जेदार पुनर्वसनचा प्रस्ताव महामंडळाचे पत्र क्र.७२८/ विपाविम/ काता.७(४)/ धाक्र.२ (३९७)६(६६५)/ २०२२, दि. २५/०१/२०२२ नुसार मा.मंत्री जलसंपदा व लाभक्षेत्र विकास कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुबंई -३२ यांना सादर करण्यात आलेला आहे.

महामंडळाचे दि. ०६/१०/२०२३ च्या पत्रान्वये रू. ११६७ लक्ष दुरुस्तीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे.

तसेच जिल्हाधीकारी अमरावती यांचे अध्यक्षतेखाली आयोजित दि.६/३/२०२३ च्या बैठकीमध्ये किरकोळ दुरूस्ती चे अंदाजपत्रक सादर करण्याबाबत सुचीत केलेले होते. त्या अनुषंगाने सर्व अदांजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आले असुन प्रशासकीय मान्यता प्राप्त खालील कामे पुर्ण करण्यात आलेली आहेत.

१.जिल्हा परिषद शाळा रंग रगोटी करणे- सदर काम सुरू असुन अंतिम टप्यात आहे.

२.CFL लाईट ऐवजी LED लाईट चे काम पुर्ण झालेले आहे.

३.विंधन विहीरीवर नविन मोटार पंप बसविण्यात आले आहेत.

या व्यतिरीक्त सुधारित दर्जेदार पुनर्वसन प्रस्तावास मंजुरी प्राप्त होताच प्रस्तावात नमूद दर्जेदार पुनर्वसनाची कामे करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिमडी, ल.पा.प्रकल्प,ता.वरुड, जि.अमरावती धरण लगतच्या बुडीत क्षेत्राबाहेरील बाधित शेतकऱ्यांसाठी नुकसान भरपाई मिळणेबाबत

**(२२) ६७९५७ (०३-०९-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिमडी, ल.पा. प्रकल्प, ता.वरुड अंतर्गत धरण लगतच्या बुडील क्षेत्राबाहेरील दहा बाधित शेतकऱ्यांच्या शेतजमिनीत पाणी शिरल्यामुळे फळबागाचे मोठया प्रमाणात नुकसान झाले असल्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीनी यांनी मा.कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांना माहे नोव्हेंबर,२०२२ रोजी वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बाधित शेतकऱ्यांचा नुकसानीबाबतचा रु.१००.१८ लक्ष इतक्या रक्कमेचा प्रस्ताव मुख्य अभियंता, वि.प्र.जलसंपदा विभाग, अमरावती यांनी मा.कार्यकारी संचालक विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर यांच्याकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार निवेदनाच्या अनुषंगाने बाधित शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-१२-२०२३) :** (१)होय, अंशत: खरे आहे.

विषयांकीत प्रकरणी लोक प्रतिनिधींकडून माहे जुन-२०२२, ऑगस्ट-२०२२, सप्टेंबर-२०२२ तसेच माहे फेब्रुवारी-२०२३ मध्ये क्षेत्रिय कार्यालयास तसेच कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचेकडे निवेदने प्राप्त झाली आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाच्या दि.१९/०६/२०२३ च्या ८३ व्या बैठकीत सदर विषय मान्यतेकरीता सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता प्राप्त झाली असून बैठकीचे कार्यवृत्त महामंडळाचे दि.१३/०७/२०२३ चे पत्र पुढील कार्यवाहीकरीता प्रादेशिक कार्यालयास पाठविण्यात आले. संबंधीतांना नुकसान भरपाई अदा करणेकरीता निधी प्राप्त झाला असून सर्व संबंधित १० शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम कार्यकारी अभियंता यांचे मार्फत माहे ऑगस्ट व सप्टेंबर मध्ये अदा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वांगी (ता.कडेगाव, जि.सांगली) येथे ऊसतोड मजूरांची केलेली फसवणूक

**(२३) ६७९८४ (२७-०९-२०२३). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांगी (ता.कडेगाव, जि.सांगली) येथील ऊस वाहतुक ठेकेदार गणपतराव हुबाले यांची ऊस तोडणीसाठी मजूर देतो असे सांगून आकाश भिसे यांनी त्यांच्याकडून ५ लाख २० हजार रुपये घेतले पण त्यांना ऊस तोडणीसाठी मजूर दिले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कडेगाव पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरोपीवर कोणत्या स्वरुपाची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे, आणि फसवणूक झालेल्या ऊस वाहतुकदाराला आर्थिक भरपाई मिळण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१२-२०२३) :** (१) व (२) होय,

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या तक्रारीनुसार कडेगाव पोलीस ठाणे येथे गु.र.नं.९४/२०२३ भा.दं.वि.कलम ४२०, ४०६, ४१७ अन्वये दिनांक ०७.०६.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) आरोपीचे बँक स्टेटमेंट प्राप्त करुन सदर फसवणूकीची रक्कम हस्तगत करण्याबाबत पोलीसांकडून प्रयत्न करण्यात येत आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

## खेड व शिरुर (जि.पुणे) तालुक्यासाठी वरदान असलेला चाकसमान प्रकल्पाच्या तृतीय सुप्रमा प्रस्तावाच्या मंजूरीबाबत

**(२४) ६८०९६ (०३-०९-२०२३). ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड व शिरुर (जि.पुणे) तालुक्यासाठी वरदान असलेला चासकमान प्रकल्पाची कामे सुधारित प्रशासकीय मान्यता अभावी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १९५६ कोटी किमतीचा सुप्रमा प्रस्तावास माहे ऑक्टोबर, २०२१ पासून वित्त विभागाचे मंजूरीसाठी शासनास सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्प पूर्ण झाल्यास ४४१७० हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रकरणाबाबत शासनाने चौकशी करुन चासकमान तृतीय सुप्रमा प्रस्तावास मंजूरी मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०१-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

चासकमान प्रकल्प ता. खेड, जि. पुणे या प्रकल्पाच्या रू.१९५६.९५ कोटीच्या तृतीय सुप्रमाचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून, सदर प्रस्तावास व्यय अग्रक्रम समितीने दि.५.०९.२०२३ रोजीच्या बैठकीत मा. मंत्रिमंडळ बैठकीत सादर करण्यास मान्यता दिली आहे.

(३) चासकमान प्रकल्पाची एकूण सिंचन क्षमता ४४१७० हेक्टर असून खेड तालुक्यातील ८२८३ हेक्टर व शिरूर तालुक्यातील ३५८८७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

(४) चासकमान प्रकल्पाच्या रू.१९५६.९५ कोटीच्या तृतीय सुप्रमाच्या प्रस्तावास मान्यता देण्याची कार्यवाही शासन स्तरावर प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिरुर (जि.पुणे) तालुक्यातील विज वितरण कार्यालयाच्या विभाजनाबाबत

**(२५) ६८०९७ (०३-०९-२०२३). ॲड.अशोक पवार (शिरुर)** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरुर (जि.पुणे) तालुक्यातील विज वितरण कार्यालयाचे शिरुर उपविभागाचे विभाजन करुन नवीन न्हावरा उपविभाग करणे तसेच शिरुर, न्हावरा, टाकळी हाजी, मांडवगण फराटा, वडगांव रासाई या कार्यालयाचे विभाग करुन नवीन शिरुर-२, मलठण व शिरसगांव काटा शाखा कार्यालय निर्मितीसाठीचा प्रस्ताव महावितरण वरिष्ठ कार्यालयाकडे मंजूरीसाठी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरण कंपनीव्दारे कंपनीची नवीन कार्यालय निर्मितीची कर्मचारी मानके/ ग्राहक मानके पुनर्विलोकनाची कार्यवाही सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कार्यालय विभाजनामुळे नवीन कार्यालयाच्या निर्मितीमुळे विज ग्राहकांच्या समस्या जलद गतीने सोडविण्यासाठी उपयोग होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावासंदर्भात आर्थिक दायित्वाचा विचार करुन धोरणात्मक निर्णय घेऊन उचित कार्यवाही करण्याचे नियोजित असल्याने शासनाने याबाबत चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०२४) :** (१), (२) व (३) हे खरे आहे,
(४) महावितरण कंपनीच्या दि.०४.११.२०१० रोजीच्या आदेशातील तरतुदीनुसार स्वतंत्र विभाग निर्मितीसाठी किमान ३०,००० व ग्रामीण शाखा निर्मितीसाठी किमान ७५००, तसेच शहर शाखा कार्यालय निर्मितीसाठी १२,५०० इतकी वीज ग्राहक संख्या असणे आवश्यक आहे.

सदर तरतुदीनुसार, सद्यस्थितीत फक्त शिरुर शहर शाखा कार्यालय विभाजनक्षम आहे. तसेच, शिरुर उप विभाग व त्याअंतर्गत प्रस्तावित शाखा कार्यालये ही महावितरण कंपनीच्या ग्राहक मानंकाप्रमाणे ग्राहक संख्येचा निकष पुर्ण करीत नाहीत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोर्शी व वरुड (जि.अमरावती) तालुक्यात शेतकऱ्यांच्या विदयुत मोटारी जळत असल्याबाबत**

**(२६) ६८२७५ (२७-०९-२०२३). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोर्शी व वरुड (जि.अमरावती) तालुक्यात संत्रा फळबागा प्रचंड प्रमाणात असल्याने फळ बागेसाठी सिंचन असणे अत्यंत आवश्यक असून शेतक-यांना विदयुत जोडणी देण्यात आलेल्या डिपीवर प्रचंड विदयुत भार येतो हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतक-यांना दिलेल्या विदयुत जोडणीवर १०० केव्हिओ ट्रान्सफार्मवर प्रचंड भार येत असल्यामुळे शेतक-यांच्या विदयुत मोटर जळत असल्यामुळे सिंचनाचे प्रचंड नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मोटर जळण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी शासन विदयुत भारानुसार २०० केव्हिओ किंवा असलेल्या विदयुत भारानुसार ट्रान्सफार्मवर लावुन देण्यासाठी काय कार्यवाही केली तसेच विद्युत मोटरपंप जळण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०२४) :** (१) व (२) बाबत,
महावितरण कंपनीच्या अमरावती परिमंडळातील मोर्शी तालुक्यात सन २०२२-२३ मध्ये एकूण ७, सन २०२३-२४ मध्ये एकूण ०२ रोहित्र आणि वरुड तालुक्यामध्ये सन २०२२-२३ मध्ये एकूण १० तर सन २०२३-२४ मध्ये एकूण ०२ रोहित्र अतिभारामुळे निकामी झाले होते, सदर रोहित्रांची महावितरण कंपनीमार्फत दुरुस्ती करण्यात आली आहे.
(३) मोर्शी व वरुड तालुक्यातील अतिभारीत रोहित्रावरील भार कमी करण्यासाठी व कृषीपंप ग्राहकांना दर्जेदार वीजपुरवठा मिळावा तसेच रोहित्र निकामी होण्याचे प्रमाण कमी व्हावे म्हणून सन २०२३-२४ मध्ये DPDC-NDSI योजनेअंतर्गत एकूण १०० केव्हिए चे ३५ नवीन रोहित्र व ६३ ते १०० केव्हिए चे ५ रोहित्रांची क्षमतावाढ प्रस्तावित करण्यात आली आहेत. तसेच सुधारित वितरण क्षेत्र योजना प्रणाली सक्षमीकरण (RDSS) योजनेअंतर्गत विविध स्तरावर क्षमतावाढ प्रस्तावित केलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात एक वर्षात किमान ३ हजार ७६३ तक्रारी मानवी हक्कांच्या उल्लंघनाच्या प्राप्त झाल्याबाबत**

**(२७) ६८५३९ (३०-०८-२०२३). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एक वर्षात किमान ३ हजार ७६३ मानवी हक्कांच्या उल्लंघनाच्या तक्रारी शासनास प्राप्त झाल्या असुन यापैकी दीड हजारांवर तक्रारी एकटया पोलीस खात्यांविरुध्द असल्याचे माहे मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य मानवी हक्क आयोगाने सन २०२०-२१ या वर्षातील कामांचा अहवाल राज्य विधीमंडळाच्या अधिवेशनात दिला आहे त्यानुसार उक्त बाब निदर्शनास आली असुन विविध तुरुंगातील कैद्याच्या मानवी हक्कांचे उल्लंघन होत असल्याचे प्रामुख्याने निदर्शनास आले ,आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या बाबत सुधारणा करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१२-२०२३) :** (१) राज्य मानवी हक्क आयोगाकडे वर्ष २०२०-२०२१ मध्ये पोलीसांविरुद्ध ३१७२ तक्रारी प्राप्त झाल्या असून, सदर तक्रारींपैकी ६ प्रकरणामध्ये पोलीसांविरुद्धचे आरोप सिद्ध झालेले आहेत.

(२) राज्य मानवी हक्क आयोगाकडे सन २०२०-२१ या वर्षात तुरुंगातील कैद्याच्या मानवी हक्कांचे उल्लंघन झालेल्या ३५९ तक्रारी प्राप्त असून, सदर तक्रारींपैकी ६ प्रकरणामध्ये पोलीसांविरुद्धचे आरोप सिद्ध झालेले आहेत.

(३) राज्य मानवी हक्क आयोगाकडून त्यांच्याकडे प्राप्त तक्रारींवर सुनावणी घेवून, त्यानुषंगाने शासनाकडे शिफारशी करण्यात येतात. आयोगाने प्रकरणानुरूप शिफारशी केल्यानुसार संबंधित पोलीस अधिकारी / कर्मचारी यांच्यावर आयोगाच्या शिफारशी / आदेशानुसार शासनाकडून कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड येथे पोलीसाच्या नावे बनावट खाते उघडून केलेला गैरव्यवहार**

**(२८) ६८५७१ (२७-०९-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथे जिल्हा पोलीस दलात कार्यरत असलेल्या एका पोलीस कर्मचा-याच्या नावे श्री रेणुकामाता मल्टिस्टेट अर्बन क्रेडिट को-ऑप सोसायटीत बनावट कागदपत्र दाखल करुन खाते उघडून चार कोटींचा अपहार केल्याचे माहे एप्रिल २०२३ वा त्या दरम्यान उघडकीस आले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१२-२०२३) :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी पोलीसस्टेशन वजिराबाद, नांदेड येथे गु.र.नं.१२८/२०२३ भा.दं.वि.कलम ४१९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१,१२०(ब) प्रमाणे दि.२०/०४/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या तपासात श्री रेणुकामाता मल्टिस्टेट अर्बन क्रेडिट को-ऑप सोसायटीत बनावट खाते उघडून रू.४,४६,१९,५४१/- चा गैरव्यवहार झाल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यानूसार या गुन्ह्यातील दोन आरोपींविरूध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून दोन फरार आरोपींचा शोध घेणे सूरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औढा नागनाथ तालुक्यात (जि.हिंगोली )रेशनच्या धान्याचा काळाबाजार होत असल्याबाबत**

**(२९) ६८८७२ (२७-०९-२०२३). श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औढा नागनाथ (जि.हिंगोली) तालुक्यात रेशनचा तांदुळ घेऊन निघालेल्या वाहनावर विशेष पोलिस पथकाने कारवाई केल्याचे माहे मे-२०२३ पहिल्या आठवडयात निदर्शनास आले हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, हिंगोलीत रेशनच्या धान्याचा काळाबाजार होत असून या प्रकरणात शासनाने चौकशी करुन संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१२-२०२३) :** (१) हिंगाली जिल्ह्यातील विशेष पोलीस पथकाने मिळालेल्या गोपनिय माहितीनूसार दि.०६/०५/२०२३ रोजी वसमत तालुक्यातील भेंडगाव पाटीजवळ संशयित वाहन व तांदुळ ताब्यात घेतला. याबाबत कुरुंदा पोलीस स्टेशन येथे पुढील चौकशी करण्यात आली असून चौकशीत सदरचा तांदूळ रेशनचा नसल्याचे आढळून आल्याने माल वाहन चालकाच्या ताब्यात देऊन स्टेशन दैनंदिनीला नोंद करण्यात आली आहे.

(२) सन २०२३ मध्ये हिंगोली जिल्ह्यात रेशनच्या काळा बाजार करणाऱ्यांवर दोन गुन्हे दाखल करण्यात आली आहेत. तसेच वेळोवेळी गोपनिय माहिती काढून रेशन धान्याचा काळाबाजार करणाऱ्यावर पोलीसांमार्फत कारवाई करण्यात येत असते.

(३) विलंब झालेला नाही.

---

**नेरला (ता.पवनी, जि.भंडारा) उपसा सिंचन योजनेअंतर्गत विरली खंदारकडे जाणाऱ्या कालव्यातील पाणी गळतीमुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान**

**(३०) ६८९४३ (१०-१०-२०२३). श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरला (ता.पवनी,जि.भंडारा) उपसा सिंचन योजनेअंतर्गत विरली खंदारकडे जाणाऱ्या कालव्यातील पाणी गळतीमुळे आजुबाजूच्या शेतात पाणी गेल्याने १८ एकर क्षेत्रातील धानपिकाचे नुकसान झाल्याचे माहे मे,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कालव्यातुन पाणी गळती होत असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे करुनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कालव्याच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यासह, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबरोबर कालव्याची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०१-२०२४) :** (१) होय, खरे आहे.

(२ व (३) हे खरे नाही.

कालव्यातून होणाऱ्या पाण्याची गळती थांबविण्याच्या दृष्टीने अस्तरीकरणाच्या कामासाठी अंदाजपत्रकात तरतूद करण्यात आली असून निविदा प्रक्रिया सद्य:स्थितीत अंतिम टप्प्यात आहे. त्यामुळे कालव्याच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष झालेले नसून कारवाईचा प्रश्न उद्धवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राळेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील शेत-यांना कृषी पंप वीज जोडणी देण्याबाबत

**(३१) ६९०५५ (२७-०९-२०२३). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राळेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील जवळपास १३० शेतकरी यांनी दिनांक १ एप्रिल, २०१६ ते ३१ मार्च २०१८ या वर्षामध्ये उच्चदाब वितरण प्रणाली योजने अतंर्गत कृषी पंप वीज जोडणी साठी अर्ज करुन अनामत रक्कम भरुनही अद्यापही शेतकऱ्यांना वीज जोडणी देण्यात आली नसल्याचे दिनांक २० मे , २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १३० शेतकऱ्यांनी जोडणीसाठी लागणारी अनामत रक्कम भरून सुध्दा त्यांच्या अर्ज बाद करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृषी पंपासाठी सन २०२१ व २०२२ मध्ये अर्ज केलेल्या शेतकऱ्यांना वीज जोडणी देण्यात येत आहे, परंतु सन २०१८ या कालावधीत अर्ज केलेल्या शेतकऱ्यांना कृषी पंपासाठी वीज जोडणी देण्यात आली नसल्याने शेतातील विहीरीला पाणी असतांना देखील शेतात दोन पिके घेता येत नसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सन २०१८ मध्ये अर्ज करुन अनामत रक्कमेची भरणा केलेल्या शेतकऱ्यांना उच्चदाब वितरण प्रणाली योजनेअंतर्गत कृषी पंपासाठी वीज जोडणी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०२४) :** (१) व (२) बाबत,

राळेगाव (जि. यवतमाळ) तालुक्यात दि.०१ एप्रिल,२०१६ ते दि.३१ मार्च, २०१८ पर्यंत एकूण ४६७ अर्जांपैकी ३३७ कृषीपंप वीज ग्राहकांना वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत. उर्वरीत १३० अनामत रक्कम भरलेले कृषीपंप ग्राहक वीज जोडणी घेण्यासाठी इच्छुक नाहीत या अभिप्रायासह त्यांची नोंदणी महावितरण संगणक प्रणालीमधून माहे ऑक्टोंबर,२०२२ मध्ये रद्द करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) व (४) वर नमूद १३० शेतकऱ्यांचे अर्ज संगणक प्रणालीमधून अयोग्य शेरा देवून रद्द करण्यात आल्याचे आढळून आले. त्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या आहेत.

राळेगाव (जि. यवतमाळ) तालुक्यातील अनामत रक्कम भरणा केलेल्या १३० कृषीपंप वीज ग्राहकांपैकी १३ अर्जदारांना वीज जोडणी देण्यात आली आहे. २३ अर्जदारांची यादी सौर ऊर्जेद्वारे ऊर्जापित करण्यासाठी महाऊर्जा (MEDA) कडे देण्यात आली असून उर्वरित अर्जदारांना महावितरण कंपनीच्या धोरणानुसार वीज जोडणी प्राधान्याने देण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे शहरांमध्ये वाढती गुन्हेगारी अवैध धंदे याला आळा बसण्याबाबत

**(३२) ६९३४१ (२७-०९-२०२३). श्री.फारूक शाह (धुळे शहर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरामध्ये वाढती गुन्हेगारी, अवैध धंदे याला आळा बसावा याकरिता जिल्हा पोलीस अधीक्षक धुळे यांना वारंवार पत्रव्यवहार केला असता पोलीस अधीक्षक धुळे यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोकप्रतिनिधी धुळे शहर यांनी या संदर्भात अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये विधानभवनाच्या प्रागंणात बसून एक दिवसाचे लक्षणीय उपोषण देखील केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी सभागृहात गृहमंत्र्यांनी पोलीस महानिरिक्षक (आई.जी.) दर्जाच्या अधिकाऱ्यामार्फत चौकशी करून कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासित केल्यानंतर पोलीस महानिरिक्षक (आई.जी.) यांनी केलेल्या चौकशीत

काय आढळले त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

मा. लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी दाखल केलेल्या निवेदनाची दखल घेवून त्यावर सखोल चौकशी करून केलेल्या कारवाईबाबत मा. लोकप्रतिनिधींना लेखी पत्रान्वये पोलीसांकडून अवगत करण्यात आले आहे.
(२) होय.
(३) मा. लोकप्रतिनिधींनी धुळे शहरात वाढत्या गुन्हेगारीबाबत मांडलेल्या त्यांच्या प्रश्नासंदर्भात सखोल चौकशी करणे शक्य व्हावे. त्यासाठी अधिक स्पष्टता होण्याच्या अनुषंगाने समक्ष म्हणणे मांडण्यासाठी पोलीसांनी दोन वेळा कळविले आहे. तसेच तीन वेळा विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालयात उपस्थित राहून म्हणणे मांडावे अथवा लेखी पत्राव्दारे अवगत करण्याबाबत कळविण्यात आले आहे. मात्र यासंदर्भात सन्माननीय लोकप्रतिनिधींनी त्यांना असलेल्या प्रश्नासंदर्भात व तक्रारीबाबत सविस्तर म्हणणे समक्ष अथवा लेखी स्वरूपात कळविलेले नाही.

विशेष, पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांनी धुळे जिल्ह्यातील अवैध धंद्ये व इतर गुन्ह्यांबाबतची माहिती प्राप्त करून घेतली असून सदर माहितीनूसार सन २०२२ व सन २०२३ मध्ये ऑक्टोबर अखेरपर्यंत अवैध धंद्यांविरूध्द एकूण १५७७ गुन्हे व चैन स्नॅचिंग, मोटार सायकल चोरी, जबरी चोरी इ. संदर्भात ६४२ गुन्हे दाखल केले असून ३४०२ आरोपींवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे. तसेच यामध्ये अधिक प्रभावी कारवाई करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयातील दमण गंगा पिंजाळ नदी जोड प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता देण्याबाबत**

**(३३) ६९५८३ (०४-०९-२०२३). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हयातील दमण गंगा पिंजाळ नदी जोड प्रकल्पाचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाकडे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पामुळे मुंबई महानगरपालिका व गोदावरी खोरे यांना फायदा होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.
दमणगंगा-पिंजाळ नदीजोड प्रकल्पास प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव महामंडळ कार्यालयाचे पत्र जा.क्र. कोपाविम/तां-३/ दमणगंगा-पिंजाळप्रमा/ ३८६२/ सन २००२, दि. ०६/१२/२०२२ अन्वये शासनास सादर केलेला आहे.
(२) अंशत: खरे आहे,
दमणगंगा-पिंजाळ नदीजोड प्रकल्पांचा फायदा मुंबई महानगरपालिका व स्थानिक जनतेस होणार आहे. दमणगंगा खोऱ्यातील ५७९ द.ल.घ.मी.(२०.४५ अघफु ) अतिरिक्त पाणी १००% विश्वासाहर्ततेनुसार पिंजाळ नदीवरील पिंजाळ धरणात वळविणे प्रस्तावित आहे. पिंजाळ धरणात वळविण्यात येणारे पाणी पुढे मुंबई शहरातील पाणी पुरवठ्यासाठी वापरणे प्रस्तावित आहे.
(३) दमणगंगा-पिंजाळ नदीजोड प्रकल्पास प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव राज्य तांत्रिक सल्लागार समितीकडून तपासून तद्नंतर महामंडळाचे दि. ०६/१२/२०२२ चे पत्रान्वये शासनास सादर केलेला आहे. शासन स्तरावरुन दि. १५/१२/२०२२ च्या पत्रानुसार सदर प्रकल्पास महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (MWRRA) यांची मान्यता प्राप्त करुन प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव पुन:श्च सादर करणेच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

सद्य:स्थितीत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणची मान्यता घेण्याबाबत कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(४) लागू नाही.

---

**अकोले तालुक्यातील कोतूळ,समशेरपूर(जि.अहमदनगर) येथे नविन पोलीस स्टेशन उभारण्याबाबत**

**(३४) ६९५९७ (०६-१०-२०२३). डॉ.किरण लहामटे (अकोले) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोतूळ, समशेरपूर (ता.अकोले, जि.अहमदनगर) या गावात मोठी बाजारपेठ असल्याने या बाजारपेठेत खूप मोठ्या प्रमाणात वर्दळ असून येथे एकही पोलीस स्टेशन नसल्याने कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राजरोसपणे होणाऱ्या गाड्यांच्या चोऱ्या, दुकाने फोडणे, घरे फोडणे, अश्या असंख्य कायदा सुव्यवस्था उद्धवणाऱ्या घटना होतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चोरी व हाणामारी या सर्वांवरती अंकुश ठेवण्यासाठी कोतूळ,समशेरपूर येथे पोलीस स्टेशन उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०२४) :** (१) व (२)

अकोले पोलीस स्टेशन अंतर्गत कोतूळ दूरक्षेत्र व समशेरपूर दूरक्षेत्र हद्दीत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये या करिता सदर दूरक्षेत्राकरिता अकोले पोलीस स्टेशन कडील प्रत्येकी १ अधिकारी, ४ पोलीस अंमलदार यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. रात्रीच्यावेळी दोन्ही दूरक्षेत्रात गस्त चालू असते. उक्त दोन्ही दूरक्षेत्रे ही पोलीस ठाणेपासून दूर अंतरावर असून दुर्गम प्रदेश आहे व रस्ते अरुंद असल्याने पोहचण्यास वेळ लागतो. परंतु, परिस्थिती नियंत्रणात आहे. अकोले पोलीस स्टेशनला तैनात असलेले अधिकारी व कर्मचारी यांचेकडून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यात येत आहे.
(३) कोतूळ, समशेरपूर येथे पोलीस ठाणे स्थापन करणेबाबतचा प्रस्ताव शासनास पोलीस महासंचालक कार्यालयाकडून प्राप्त झाल्यानंतर उचित कार्यवाही करण्यात येईल.
प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील महाराष्ट्र सुरक्षारक्षकांचा वेतनामध्ये वाढ करण्याबाबत**

**(३५) ६९७११ (२७-०९-२०२३). श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महाराष्ट्र सुरक्षकांना तुटपुंजी वाढ केल्याने सुरक्षारक्षकांमध्ये असंतोष निर्माण झाला असल्याची बाब माहे मे २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई , ठाणे, रायगड, नाशिक, चंद्रपूर, नागपूर, सांगली, अहमदनगर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर ,रत्नागिरी सिंधुदुर्ग ,पुणे अशा १२ जिल्ह्यातील कार्यालयासमोर एकाच वेळी निषेध आंदोलन करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाढलेल्या महागाईचा विचार करून सध्या जाहीर केलेल्या वेतनात लवकरात लवकर बदल करून किमान पाच ते सहा हजार इतकी वेतन वाढ केली नाही तर आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा महाराष्ट्र सुरक्षा रक्षक महासंघाने शासनास दिला आहे, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, सुरक्षारक्षकांचे वेतन वाढ करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१२-२०२३) :** (१) (२) व (३) हे खरे नाही.
(४) महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या दि.२६.०७.२०२३ रोजीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत आस्थापनांकडून घ्यावयाचे सुरक्षा शुल्क यामध्ये सुरक्षा कर्मीच्या प्रत्येक पदासाठी रु.५०००/- अशी वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.सदरची शुल्क वाढ डिसेंबर,२०२३ पासून लागू करण्यात येणार आहे. त्याप्रमाणे सुरक्षा कर्मीच्या वेतनात देखील डिसेंबर २०२३ पासून वाढ करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यातील वीस बंदरे अतिरेक्यांच्या 'हिटलिस्टवर' असल्याने सुरक्षेच्या दृष्टीने विनाविलंब कार्यवाही करण्याबाबत

**(३६) ६९८१८ (२७-०९-२०२३). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नौदलाने दिनांक २६/११/१९९३ च्या मुंबईतील साखळी बॉम्बस्फोटनंतर केलेल्या सर्वेक्षणात रायगड जिल्ह्यातील वीस बंदरे अतिसंवेदनशील घोषित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यावेळी नौदलाने या सर्वे बंदरांवर कडेकोट सुरक्षा व्यवस्था तैनात करतानाच मासेमारी नौकांसह खलाशांची नोंद ठेवण्यासाठी टोकन पद्धत सुरु करण्याचा निर्णय घेतला होता, मात्र सध्य:स्थितीत काही बंदरे वगळता उर्वरित बंदरावरील सुरक्षा रामभरोसे असल्याच्या कारभारामुळे मांडवा, रेवस, अलिबाग सह अन्य सर्वे बंदरे अतिरेक्यांच्या हिटलिस्टवर असून घातपाती कारवाया करण्यासाठी येथून केव्हाही घुसखोरी होण्याची भीती असतानाही राज्य शासन गेल्या काही वर्षापासून गाफील आहे, हे ही खरे आहे काय;
(३) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाबाबत सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार रायगड जिल्ह्यातील वीस बंदरा सह राज्यातील १९ बंदरे अतिरेकी हल्ल्याच्या दृष्टीने अतिसंवेदनशील असल्याचे नौदलाच्या तपासात आढळून आल्याने राज्याच्या सुरक्षेच्या दृष्टीने व कोणत्याही प्रकारे अतिरेकी हल्ला होऊ नये या दृष्टीने शासनाने कोणती खबरदारी घेतली आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही,
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) रायगड जिल्हयातील बंदरे व लँडींग पॉईटची सुरक्षा वाढविण्याकरिता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.
(१) रायगड जिल्हयातील संवेदनशील लँडींग पॉईटवर मस्त्यव्यवसाय विभागामार्फत सुरक्षा रक्षक नेमण्यात येतात व त्यांची तपासणी ही रायगड पोलीसांमार्फत केली जाते.
(२) रायगड जिल्हयातील सर्व संवेदनशील फिश लँडिंग पॉईन्टस/ बंदरे येथे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत सह आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीच्या देखरेखीखाली सर्व संवेदनशील फिश लँडींग पॉईन्टस/ बंदरे यथे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची प्रक्रिया चालू आहे.

(३) रायगड जिल्हयातील ०९ संवेदनशील लँडींग पॉईटवर ४३ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलले आहेत. तसेच सागरी सुरक्षा योजना फेज-३ अंतर्गत ड्रोन व सीसीटीव्हीची मागणी केंद्र शासनाकडे करण्यात आली आहे.
(४) त्याचबरोबर बंदराच्या सुरक्षिततेसाठी पोलीस विभागाकडून नियमितपणे सागरी किनाराभागात वाहन गस्त, पायी गस्त व पेट्रोलींग करण्यात येते.
(५) सागरी सुरक्षेकरिता जास्तीत जास्त सागर रक्षक दलाच्या बैठका घेऊन मच्छिमारांना सर्तकतेबाबत सूचना देण्यात येतात. समन्वय समितीच्या दरमहा बैठका आयोजित करण्यात येतात.
(६) संवेदनशील लँडींग पॉईटवर सद्य:स्थितीत नेमण्यात आलेल्या सुरक्षा रक्षकांऐवजी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडील प्रशिक्षीत सुरक्षा रक्षक नेमण्याबाबत मत्स्यव्यवसाय विभागकडून कार्यवाही करण्यात येत आहे.
(७) भारतीय नौदलातर्फे सन २०१४-१५ मध्ये लँडींग पॉईटचे सर्वेक्षण करण्यात आले होते, तथापि, सदर ९१ संवेदनशील लँडींग पॉईटची पुन:पडताळणी करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## मृदा व जलसंधारण उपविभाग पारोळा (जिल्हा जळगाव) या विभागामार्फत साठवण बंधाऱ्याचे सर्वेक्षणाच्या कामाबाबत

**(३७) ६९९३० (३१-०८-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मृद व जलसंधारण उपविभाग, पारोळा (जिल्हा जळगाव) या विभागामार्फत साठवण बंधाऱ्याचे सर्वेक्षणाच्या कामासाठी रुपये २०० कोटी माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान मंजूर केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जळगाव जलसंधारण अधिकारी व पारोळा उपविभागाचे उपविभागीय अधिकारी अभियंता यांनी संगनमत करुन निविदा न मागविता उपविभागात काम केले त्यात ६.५ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे दिनांक १ एप्रिल, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, त्यानुषंगाने उक्त ठिकाणच्या साठवण बंधाऱ्याच्या कामामध्ये गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय राठोड (०३-०१-२०२४) :** (१) हे, अंशत: खरे आहे.
सदर सर्वेक्षणाच्या कामांसाठी माहे जाने- २०२२ मध्ये निधी मंजूर झाला होता.
(२) हे, खरे नाही.
लोक प्रतिनिधीच्या मागणी पुर्ततेसाठी मृद व जलसंधारण विभागाचे दि.११/२/२०२२ रोजीच्या परिपत्रकातील मार्गदर्शक सूचनांनुसार विभागीय स्तरावर कार्यवाही करण्यात आली आहे. प्रस्तावित योजनांचे सर्वेक्षण व अन्वेषणाची कामे प्रचलित नियम व कार्यपध्दतीनुसार विभागीय (जिल्हा जलसंधारण अधिकारी) स्तरावर निविदा प्रक्रिया या पूर्ण करून निविदे अंतर्गत सुबे मजूर संस्था व मजूर फेडरेशन संस्थामार्फत सर्वेक्षण व अन्वेषणची कामे पूर्ण करण्यात आली आहेत.
(३) सदर सर्वेक्षण कामांच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, जळगाव कार्यालयास प्राप्त तक्रार जिल्हाधिकारी जळगाव यांनी दि.०६/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये पुढील कार्यवाहीस्तव जिल्हा जलसंधारण अधिकारी, जळगाव कार्यालयास पाठविली होती. त्यानुषंगाने चौकशी करण्यासाठी जिल्हा जलसंधारण अधिकारी, जळगाव यांनी दि. १२/१०/२०२२ रोजीच्या आदेशान्वये चौकशी समिती गठीत केली असून सदर चौकशी समितीचा अहवाल अपर आयुक्त जलसंधारण, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, पूणे यांना सादर केला असता, चौकशी अहवालाच्या अनुषंगाने त्यांनी प्रकरण निकाली काढले आहे.

आयुक्त, मृद व जलसंधारण, छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांच्या कार्यालयास प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने तपासणी करण्यासाठी दि.०६/१०/२०२३ रोजीच्या आदेशान्वये चौकशी पथकाची नेमणूक केली असून त्यानुषंगाने कार्यवाही सूरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत गोंधळ घालणाऱ्यावर कारवाई करण्याबाबत

**(३८) ७०२८१ (२७-०९-२०२३). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हा परिषदेची सर्वसाधारण सभा दिंनाक २३ मार्च २०२३ रोजी दुपारी १ वाजता जिल्हा परिषदेच्या सभागृहात सुरू असतांना श्री ज्ञानेश्वर कंभाले सदस्य जिल्हा परिषद नागपूर यांनी सभेत व्यत्यय आणून, कागदपत्र फेकुन, शिवीगाळ करणे सुरू केल्याने जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यपालन अधिकारी यांनी दिंनाक ३ मार्च २०२३ रोजी पोलीस निरिक्षक सदर पोलीस स्टेशन नागपूर यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी संबधित अधिकाऱ्यांनी अद्यापही कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीत काय आढळून आले व संबधितावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी पोलीस स्टेशन सदर नागपूर शहर यांना दिलेल्या लेखी तक्रारीच्या अनुषंगाने पो.ठाणे सदर, नागपूर शहर येथे अदखलपात्र नोंद क्र.४९१/२०२३ कलम ५०४, ४२७ भ.दं.वि. अन्वये नोंद करण्यात आली आहे. श्री.ज्ञानेश्वर कंभाले, जिल्हा परिषद सदस्य यांना सदर प्रकरणी न्यायालयात दाद मागण्याची समज देण्यात आली. तसेच त्यांना भविष्यात उक्त प्रकरणी दखलपात्र गुन्हा घडण्याचा संभव निर्माण होवू शकतो म्हणून सदर वाद योग्य मार्गाने दूर करण्याबाबत पोलीस ठाणे सदर, नागपूर यांनी कलम १४९ सीआरपीसी प्रमाणे नोटीस दिली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालगड तिठा (ता.दापोली, जि रत्नागिरी) याठिकाणी २० जीवंत गावठी बॉम्ब सापडल्याबाबत

**(३९) ७०३१५ (२७-०९-२०२३). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय
(१) पालगड तिठा (ता.दापोली, जि रत्नागिरी) याठिकाणी एक इसम गावठी बॉम्ब विक्री करीता येणार असल्याची विश्वसनीय बातमी उपविभागीय पोलीस अधिकारी, खेड यांच्या कार्यालयातील अंगरक्षक म्हणून कार्यरत असलेले श्री.रमेश तुकाराम बांगर, पोलीस शिपाई, बक्कल क्र.९२० यांना मिळाल्यानंतर त्यांनी सदरहू घटनेची माहिती वरिष्ठांना दिल्यानंतर उपविभागीय, पोलीस अधिकारी, खेड, श्री. राजेंद्र मुणगेकर यांच्या नेतृत्वाखाली एक पोलीस पथक तातडीने तयार करून त्या पथकाने एका दुचाकीवरून आलेल्या इसमास थांबवून त्यांची झडती घेतली असता त्यांनी आणलेल्या पिशवीत एकूण २० जीवंत बॉम्ब पोलीस पथकाला सापडले असल्याचे दिनांक १५ जुन, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय;
(२) असल्यास, याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती ठोस कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-१२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी सखोल चौकशी करण्यात येऊन आली दापोली पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ९७/२०२३, भा. दं.वि. कलम २८६ सह भारताचा बारी पदार्थ अधिनियम १९०८ चे कलम ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यात एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीकडून २० बॉम्बसदृश्य स्फोटक पदार्थ व एक मोटरसायकल जप्त करण्यात आली आहे. सद्यस्थितीत सदर गुन्हा पोलीस तपासावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर परिमंडळातील भादा (ता. औसा, जि.लातूर) येथील महावितरणच्या शाखा कार्यालयास मनुष्यबळ उपलब्ध होण्याबाबत

**(४०) ७०४८० (२७-०९-२०२३). श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरणच्या लातूर परिमंडळातील भादा (ता. औसा, जि.लातूर) शाखा कार्यालयात दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक मनुष्यबळ नसल्याने कामकाजात अडचणी येऊन शेतक-यांत वारंवार असंतोषाचे वातावरण निर्माण होत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यालयास तात्काळ मनुष्यबळ उपलब्ध करावे, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि. २३ जानेवारी २०२३ रोजी वा सुमारास संबंधित विभागाकडे पत्राद्वारे केली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे. विद्यमान भादा शाखा कार्यालयाचे विभाजन करुन नवीन शिवली शाखा कार्यालय निर्माण करण्याची मागणी केलेली आहे.

(३) रिक्त पदे भरण्याकरीता वाढीव मनुष्यबळ उपलब्ध करण्यासाठी विद्यमान शाखा कार्यालयाचे विभाजन करून नवीन शाखा कार्यालय नव्याने निर्माण करणेबाबत मागणी करण्यात आलेली असली तरी सद्यस्थितीत भादा शाखा कार्यालयातील वीज ग्राहकांची संख्या १२,१७१ असून कंपनीच्या प्रस्तुत ग्राहक मानकानुसार भादा शाखा कार्यालय विभाजनक्षम नाही. तरी भविष्यात ग्राहक मानकाचे निकष पूर्ण झाल्यास कंपनीची ग्राहक मानके व आर्थिक दायित्वाचा विचार करुन योग्य कार्यवाही करण्यात येईल.

(४) लागू नाही.

---

## नाशिक येथील त्र्यंबकेश्वर मंदिरात बेकायदा दर्शन शुल्क आकारत असल्याबाबत

**(४१) ७०५०१ (०३-०९-२०२३). श्री.अतुल बेनके (जुन्नर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील त्र्यंबकेश्वर मंदिरात उत्तरेकडील प्रवेशद्वारातून आकारण्यात येणारे २०० रुपये दर्शन शुल्क बंद करण्याचे स्पष्ट निर्देश भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने दिले असतानाही त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्टने आदेशाचे उल्लंघन करुन २०० रुपये दर्शन शुल्क व जागोजागी ठेवलेल्या बेकायदा दानपेट्यांच्या माध्यमातून देणग्या गोळा करीत असल्याचे त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्टच्या माजी विश्वस्त सौ.ललिता शिंदे यांनी पुरातत्व विभागाकडे दिनांक.२७मार्च,२०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन देऊन तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ए.एम.एस.आर. कायदा १९५८ च्या नियम १९५९ नुसार केंद्रीय संरक्षित स्मारकामध्ये पैसे घेण्यास परवानगी नसतानाही संबंधित कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या विद्यमान मंदिर देवस्थान ट्रस्टच्या विश्वस्तांविरुद्ध शासनातर्फे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) असल्यास, त्र्यंबकेश्वर मंदिर हे भारतातील बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असल्याने भारताच्या कानाकोपऱ्यातून येत असलेल्या लाखो भाविकांची होत असलेली आर्थिक लूट थांबविण्यासाठी शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०१-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

पुरातत्व विभागाकडून प्राप्त माहितीनुसार त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्टच्या माजी विश्वस्त श्रीमती ललिता शिंदे यांनी भारतीय पुरातत्व विभागाकडे त्र्यंबकेश्वर मंदिरात उत्तरेकडील प्रवेशव्दारातून आकारण्यात येणारे रु.२००/- दर्शन शुल्काबाबत लेखी निवेदन देऊन तक्रार दाखल केली आहे.
(२) त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्ट, ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक, सार्वजनिक न्यास नोंदणी क्र. ए- ४०५ (नाशिक), या न्यास मंदीरामध्ये रूपये २००/- दर्शन शुल्क घेण्याबाबतच्या विषयासंदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका, क्रमांक १४७ /२०२२ सद्यस्थितीत न्याय प्रविष्ट असून सदरची जनहित याचिका याचिकाकर्त्या श्रीमती ललिता संदिप शिंदे यांनी दाखल केलेली आहे. सदर याचिकेत पुरातत्व विभागास पक्षकार केले आहे. शिवाय पुरातत्व विभागाकडे श्रीमती ललिता शिंदे यांनी केलेली तक्रार धर्मादाय आयुक्त कार्यालय,नाशिक येथे प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(३) सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने व धर्मादाय आयुक्त कार्यालय, नाशिक यांना तक्रार प्राप्त न झाल्याने अद्याप शासनातर्फे कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(४) निरंक.

---

**सीना नदीवरील दहा कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांचे लातूर टाईप बॅरेज मध्ये रूपांतरित करण्याबाबत**

**(४२) ७०५९२ (१०-१०-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सीना नदीवरील दहा कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांचे लातूर टाईप बॅरेज मध्ये रूपांतरीत करण्याच्या कामास विस्तार व सुधार कार्यक्रमांतर्गत तत्कालीन शासन काळात मान्यता देण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सीना नदीवरील दहा कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांचे लातूर टाईप बॅरेज मध्ये रूपांतरित करण्याच्या कामाची सर्वेक्षण व अंदाजपत्रकाचे काम महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने पूर्ण केलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कर्जत व जामखेड तालुक्यातील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांना निधी उपलब्ध होण्यासाठी अहवाल महाराष्ट्र कृष्णा खोरे महामंडळाकडून दिनांक २३ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या पत्राअन्वये मागविण्यात आला होता, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, सीना नदीवरील कर्जत व जामखेड तालुक्यातील कोल्हापूर पद्धतीच्या बंधारे यांचे लातूर टाईप मॅरेज मध्ये रूपांतरित करण्याचे काम सुरू करण्याबाबत व निधी उपलब्ध होणे बाबत शासन स्तरावरून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे,
सीना नदीवरील कर्जत तालुक्यातील तीन, जामखेड तालुक्यातील एक व आष्टी तालुक्यातील सहा अशा एकूण दहा कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांचे लातूर टाईप बॅरेज मध्ये रुपांतरीत करण्याच्या कामास विस्तार व सुधार कार्यक्रमांतर्गत प्रायोगिक तत्वावर करण्यास शासन पत्र दिनांक २८/०६/२०२२ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

(२) नाही, हे खरे नाही,
सीना नदीवरील दहा कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याचे लातूर टाईप बॅरेज मध्ये रुपांतरीत करण्याच्या कामासाठी प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी मुख्य अभियंता (विप्र) पुणे यांनी सर्वेक्षण व अंदाजपत्रकाचे कामास दि.१९/०७/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. अद्याप सर्वेक्षणाचे काम पूर्ण करण्यात आलेले नाही.
(३) होय, हे खरे आहे.
या बाबतचा अहवाल महामंडळाचे पत्र क्र. ६२७७ दिनांक ३१/१०/२०२३ अन्वये शासनास प्राप्त झाला आहे.
(४) कर्जत, जामखेड व आष्टी तालुक्यातील कामाचे सर्वेक्षणानंतर क्षेत्रिय स्तरावरून सविस्तर अंदाजपत्रक प्राप्त झाल्यानंतर त्यास प्रचलित नियमांच्या अधीन राहून विस्तार सुधारणा अंतर्गत प्रशासकीय मान्यतेबाबतचा निर्णय घेण्याचे नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड शहरातील एमआयडीसी भागात नवीन पोलिस ठाणे मंजूर होण्याबाबत**

**(४३) ७०६१४ (२७-०९-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड शहरातील लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असून बीड शहरात एमआयडीसी असल्यामुळे व त्याठिकाणी मोठया प्रमाणात कारखाने असल्यामुळे कारखान्यात काम करणाऱ्या मजूरांना रात्री बेरात्री प्रवास करावा लागत असून काही वेळा त्याठिकाणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवत असल्यामुळे एमआयडीसी भागात नवीन पोलीस ठाणे होण्याची मागणी संबधित स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १२ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास तत्कालीन मा.गृह मंत्री यांचेकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने नवीन पोलीस स्टेशन उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाच्या दि.०९.१२.२०२१ व दि.१०.०६.२०२२ च्या पत्रान्वये पोलीस महासंचालक कार्यालयाकडून अहवाल मागविण्यात आला. सदर अहवाल शासनास अद्याप अप्राप्त आहे.
तसेच बीड शहरात एमआयडीसी भागात नवीन पोलीस स्टेशन उभारण्याबाबत पोलीस अधीक्षक, बीड यांनी त्यांचे दि.२०/०१/२०२२ अन्वये पोलीस महासंचालक कार्यालयास प्रस्ताव सादर केला होता. परंतु सदरचा प्रस्ताव परिपूर्ण नसल्यामुळे परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याबाबत पोलीस अधीक्षक, बीड यांना पोलीस महासंचालक कार्यालयाने दि.०२/०३/२०२२ च्या पत्रान्वये कळविले आहे. उक्त प्रस्ताव शासनास अद्याप प्राप्त झालेला नाही. प्रस्ताव प्राप्त होताच नियमानुसार तपासून पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्मवीर कन्नमवार जलाशय रेगडी (ता.चार्मोशी, जि.गडचिरोली) प्रकल्पाच्या दुरुस्तीबाबत**

**(४४) ७०८९५ (१०-१०-२०२३). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रेगडी (ता.चामोर्शी, जि.गडचिरोली) येथे सिंचनासाठी कन्नमवार जलाशयाची निर्मिती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्प जुना असून वितरण प्रणाली वरील जीर्ण झालेल्या बांधकामाचे पुर्नबांधणी करणे आवश्यक असून अस्तरीकरण नसलेल्या भागातून होत असलेल्या पाझरामुळे पाण्याचा मोठा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्या ठिकाणी संधानक अस्तरीकरणाची किंवा नावीन्यपूर्ण योजनेअंतर्गत बी.जी.एम तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने अस्तरीकरणाची कामे करण्यासाठी किमान ५ कोटींच्या निधीची मागणी शासनाकडे करुनही सदर निधी उपलब्ध करुन देण्यात आला नाही हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार सदर जलाशयाच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-१२-२०२३) :** (१) होय.
(२) होय.
(३) दि. १४.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये स्थानिक विधानसभा सदस्य यांनी कन्नमवार जलाशय (दिना प्रकल्प) रेगडी या प्रकल्पांतर्गत दुरुस्तीच्या कामांकरीता जवळपास रु. ५ कोटी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली आहे. त्यानुषंगाने महामंडळाकडून दि. ०४.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त माहितीनूसार प्रथम प्राधान्याने करावयाच्या अतिआवश्यक दुरुस्ती कामाकरीता रु. ५.७० कोटी निधीची आवश्यकता असून सदर कामे बिगर सिंचन प्रापणसुचीमध्ये प्रस्तावित करण्याचे नियोजित आहे. तसेच संधानक अस्तरीकरणाची किंवा नाविन्यपुर्ण योजनेअंतर्गत Bituminous Geo-Membrane (BGM) तंत्रज्ञानाद्वारे अस्तरीकरण करणेबाबतचा प्रस्ताव तयार करण्याचे काम क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(४) कामाची निकड लक्षात घेता क्षेत्रिय स्तरावरुन
रु. ३.६५ कोटी किंमतीची बांधकाम दुरुस्तीची कामे क्षेत्रिय कार्यालयाकडून महामंडळास सादर केलेल्या सन २०२३-२४ च्या बिगर सिंचन प्रापणसूचीमध्ये प्रस्तावीत करण्यात आलेली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खुंटेफळ साठवण तलावाच्या (ता.आष्टी, जि.बीड) बुडीत क्षेत्रातील ४५ हेक्टर भूसंपादित प्रक्रियेत झालेल्या गैरप्रकाराबाबत

**(४५) ७०९१० (०४-०९-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खुंटेफळ (जि. बीड, ता.आष्टी) येथील साठवण तलावाच्या बुडीत क्षेत्रातील ४५ हेक्टर भूसंपादित प्रक्रियेत मोठया प्रमाणात अनियमितता व गैरप्रकार झाल्याची लेखी तक्रार अप्पर मुख्य सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई तसेच जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे दि. ३० मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास करण्यांत आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अधिक्षक अभियंता, जलसंपदा औरंगाबाद विभाग यांनी कार्यकारी अभियंता, ना.म.का.वि.क्र.२,छत्रपती संभाजीनगर यांनी भूसंपादित जमीन सरळ खरेदी करण्यासाठी दि. ३१ मार्च, २०२३ रोजी ३५ कोटी रु. निधी वर्ग करण्यांत आलेला होता, तो निधी जिल्हाधिकारी, बीड यांचेकडे वर्ग करण्यासाठी दि. ८ मे, २०२३ रोजी पत्र दिले असतांना कार्यकारी अभियंता यांनी १७ कोटी रु. जमिनीची खरेदी न करतां परस्पर वाटप केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१२-२०२३) :** (१) होय.
(२) व (३) हे खरे नाही.
अधिक्षक अभियंता, जलसंपदा औरंगाबाद विभाग यांनी कार्यकारी अभियंता, ना.म.का.वि.क्र.२, छत्रपती संभाजीनगर यांनी खुंटेफळ, ता.आष्टी येथील साठवण तलावाच्या बुडीत क्षेत्रातील भूसंपादित जमीन सरळ खरेदी करण्यासाठी दि.३१ मार्च, २०२३ रोजी केलेल्या मागणीनुसार रु.३५.०६ कोटी निधी वर्ग करण्यात आला. त्यापैकी त्यांनी

रु.१७.१५ कोटी मोबदला मागणी केलेल्या प्रकल्पबाधीतांना महसुल व वन विभागाच्या शासन निर्णय दि.१२.५.२०१५ मधील २अ प्रमाणे दि.११.४.२०२३ रोजी वाटप केला. तद्नंतर अधीक्षक अभियंता, औरंगाबाद पाटबंधारे मंडळ कार्यालयाने भूसंपादन प्रक्रियेबाबत तक्रारी प्राप्त झाल्याने तक्रारींची शहानिशा करणे आवश्यक असल्याने सदर निधी जिल्हाधिकारी, बीड यांचेकडे वर्ग करण्याबाबत कार्यकारी अभियंता, नांदूर मधमेश्वर कालवा विभाग क्र.२ यांना दि.८.५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. तसेच सदर निधी उप विभागीय अधिकारी पाटोदा यांचेकडे वर्ग करणे योग्य राहील असे अधीक्षक अभियंता, औरंगाबाद पाटबंधारे मंडळ कार्यालयाने दि.१९.५.२०२३ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, बीड यांना कळविले आहे.

त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, बीड यांनी दि.६.६.२०२३ च्या पत्रान्वये योग्य ती चौकशी करुन आपल्या स्तरावरुन कारवाई करण्यात यावी असे अधीक्षक अभियंता, औरंगाबाद पाटबंधारे मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांना निदेशीत केले. त्यानुसार संपादक संस्था म्हणून जलसंपदा विभागाने निवाड्यातील इतर घटकांच्या मुल्यांकनाची फेरतपासणी करुन सादर केलेल्या माहितीनुसार दि.१४.७.२०२३ रोजी उपविभागीय अधिकारी, पाटोदा यांनी सुधारीत निवाडा जाहिर केला. त्यानुसार प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना महसूल व वन विभाग शासन निर्णय दि.२५.१.२०१७ नुसार उर्वरीत मावेजा देवून थेट खरेदीखत करुन भुसंपादनाची कार्यवाही पुर्ण करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्धवत नाही.

---

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील बेलपत्र सोसायटीमध्ये वाईन च्या दुकानासाठी स्थानिक ग्रामस्थांचा विरोध असल्याबाबत

**(४६) ७०९१७ (२४-०८-२०२३). श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वासिंद (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील खातिवली ग्रामपंचायत हद्दीतील बेलपत्र सोसायटीमध्ये वाईन शॉपसाठी ग्रामसेवक आणि प्रशासक यांनी स्थानिक ग्रामस्थांना पूर्व कल्पना न देता आर्थिक व्यवहार केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आर्थिक व्यवहार हा विनापरवानगीने केल्याची तक्रार सयुज्य महिला बचत गट व खातिवली ग्रामस्थांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिक्षकांकडे लेखी निवेदनाद्वारे केली असून सदर वाईन शॉपसाठी दिलेली परवानगी रद्द करण्यात यावी, अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वाईन शॉपला स्थानिक ग्रामस्थांचा तीव्र विरोध असून उक्त प्रकरणाकरीता दिलेली परवानगी रद्द न केल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे हे ही खरे आहे

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शंभूराज देसाई (२३-११-२०२३) :**(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) हे खरे आहे.

सदर प्रकरणी मे. गुलशन वाईन्स एफ.एल-२, अनुज्ञप्ती क्र. ५५ या अनुज्ञप्तीचे बेलपत्र बिल्डींग, शॉप नं. ६, ७, ८ खातिवली वाशिंद, ता. शहापुर, जि. ठाणे या जागेत स्थलांतराप्रकरणी प्राप्त स्थानिक ग्रामस्थ व इतर तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कल्याण विभाग, ठाणे यांच्यामार्फत चौकशी केली असता चौकशी अहवालात ग्रामपंचायत खातिवली, मु. खातिवली, ता. शहापुर, जि. ठाणे यांच्या दि. १८.०४.२०२३ रोजी झालेल्या ग्रामसभेमध्ये मे. गुलशन वाईन्स या एफ.एल-२ अनुज्ञप्तीस ना-हरकत दाखला मंजूर करण्यात आला असल्याचे तसेच सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीत तथ्य नसल्याचे दि.०८.०६.२०२३ रोजीच्या ग्रामसभेतील ठरावामध्ये नमूद केले आहे. त्यानुसार सदर अनुज्ञप्तीचे जिल्ह्यातंर्गत स्थलांतरणासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या दि. ०५.०५.२०२३ रोजीच्या आदेशान्वये स्थलांतरण झालेले आहे.

तसेच, मुंबई दारुबंदी (ग्रामसभा ठराव पारित केल्यामुळे अथवा नगरपरिषद/महानगरपालिकेच्या वॉर्डातील मतदारांनी निवेदन दिल्यामुळे अनुज्ञप्ती बंद करणे) आदेश, २००८ व शासन अधिसूचना दि. १२.०२.२००९ तसेच, दि. ०६.०६.२०१७ मधील तरतुदीनुसार मद्यविक्री अनुज्ञप्ती बंद करण्याबाबत स्थानिक स्वराज संस्थामार्फत करावयाची प्रक्रिया विहित करण्यात आली आहे. त्यानुसार संबंधित प्राधिकरण यांच्याकडून निवेदन/ठराव प्राप्त झालेले नसल्याने दारुबंदीबाबतची कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच, अनुज्ञप्ती बंद करण्याबाबत सदर प्रक्रियेनुसार निवेदन प्राप्त झाल्यास योग्य कार्यवाही करण्यात येईल असे सयुज्य महिला बचत गट व ग्रामस्थ खातिवली यांना अधीक्षक, राउशु, ठाणे यांचे वतीने दि. ३०.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जत ( जि. सांगली ) तालुक्यातील शंख मध्यम प्रकल्प डावा कालव्यावरील वितरिका -११ व १२ ते २१ संपादित जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत**

**(४७) ७०९६९ (१०-१०-२०२३). श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जत (जि. सांगली) तालुक्यातील शंख मध्यम प्रकल्प डावा कालव्यावरील वितरिका ११ व १२ ते २१ संपादित जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत नगररचना सांगली यांचेकडून दर निश्चिती करुन तीन महिन्यात अंतिम निवाडा झाल्यानंतर बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई अदा करण्यात येणार असल्याचे लघु पाटबंधारे बांधकाम उपविभाग, जत यांचेकडून माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान कळविण्यात आले होते, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, अद्यापही शेतकऱ्यांना नुकसान भरपाई अदा करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०१-२०२४) :**(१) होय.
(२) हे खरे नाही.
मौजे बेळोडंगी व मौजे हळळी येथील शेतकऱ्यांना रु.१,६५,५०,०००/- इतकी रक्कम संपादित क्षेत्रासाठी अदा करण्यात आली असुन उर्वरित संपादित क्षेत्रासाठी रक्कम अदा करणेची कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) संख मध्यम प्रकल्प डावा कालव्यावरील कि.मी.३२ ते ३४ मधील वितरिका ११ व १२ ते २१ मौजे बेळोडंगी मधील ६.८० हे.आर व मौजे हळळी येथील १५.४९ हे.आर असे एकूण २२.२९ हे.आर चे प्रस्ताव मंजुर झाले असून सदर गावामधील खरेदी प्रगतीत आहे. मौजे बेळोडंगी मधील ०.६२४ हे.आर व मौजे हळळी मधील ४.८४ हे.आर ची खरेदी पुर्ण झाली असून त्यापोटी संबंधित शेतकऱ्यांना रु.१,६५,५०,०००/- इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे. उर्वरित मंजूर क्षेत्राची खरेदी करणेबाबत कार्यवाही प्रगतीत आहे. तसेच , संख मध्यम प्रकल्प डावा कालवा ३२ ते ३४ मधील वितरिका क्र. १२ ते २१ चे मौजे बेळोंडगी व उमदी गावचे असे दोन प्रस्ताव उपविभागीय अधिकारी, जत यांना सादर केले असून मंजुरीबाबतची कार्यवाही प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर तालुक्यात घरफोडया व चोऱ्यांमध्ये झालेली वाढ

**(४८) ७१०५९ (०३-०९-२०२३). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवापूर (जि.नंदुरबार) तालुक्यातील विसरवाडी येथे ३ ठिकाणी घरफोड्या करुन चोरट्यांनी लाखो रुपयांची ऐवज चोरुन नेल्याचे दिनांक १८ जुन, २०२३ रोजी वा त्यासुमारा निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकाच रात्रीत नवापूर तालुक्यातील विसरवाडी येथे ३ ठिकाणी घरफोड्या झाल्यामुळे नागरीकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी रात्रीची गस्त व बंदोबस्त न ठेवल्यामुळे चोरीच्या घटना वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन पोलिसांनी गस्त व बंदोबस्त वाढविणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच चोरट्यांचा तपास लागून चोरीस गेलेला ऐवज पोलिसांनी हस्तगत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर तालुक्यातील विसरवाडी येथे दिनांक १९.०६.२०२३ रोजी एक घरफोडीची घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३)

विसरवाडी येथे झालेल्या घरफोडीच्या घटनेमध्ये विसरवाडी पोलीस स्टेशन, नंदूरबार येथे गु.रं.नं.२४५/२०२३ भा.दं.वि. कलम ३८०, ४५७, ५११ प्रमाणे दि.१९.०६.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटनेत रु.२२ हजाराचा मुद्देमाल चोरीला गेल्याचे निदर्शनास आले आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीस अटक करण्यात आले असून आरोपीकडून रुपये १५०००/- किंमतीचा ऐवज हस्तगत करण्यात आला आहे.

विसरवाडी पोलीस स्टेशन हद्दीत दररोज रात्रगस्त ठेवण्यात येते त्यामध्ये अधिकारी व अंमलदारांची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच अशा घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी नाकाबंदी, संशंयीत ठिकाणी स्कॅनर लावण्यात आले आहेत. यामुळे विसरवाडी येथील नागरीकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झालेले नाही.

(४) विलंब झालेला नाही.

---

### अमरावती जिल्ह्यात मोर्शी येथे अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालय सुरू करण्याबाबत

**(४९) ७१०९६ (२७-०९-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोर्शी (जि.अमरावती) येथे अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालय व्हावे यासाठी मागील २० वर्षापासून मागणी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोर्शी हा तालुका मध्यवर्ती ठिकाण असून मोर्शी हे उपविभागीय कार्यालयाचे शहर व जुने तहसील असल्यामुळे मोर्शी येथे अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालय निर्माण केल्यामुळे स्थानिक जनतेला सोयीस्कर होणार आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून मोर्शी येथे अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालय सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१२-२०२३) :** (१) राज्यात नव्याने न्यायालय स्थापन करावयाचे असल्यास मा.उच्च न्यायालय स्तरावर गठीत समितीकडून शासनास शिफारस करण्यात येते व नंतर शासन स्तरावर याबाबत निर्णय घेण्यात येतो. मा.उच्च न्यायालयाकडे किंवा शासनाकडे अमरावती जिल्हयातील मोर्शी येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश

यांचे न्यायालय स्थापन करण्याचा प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. परंतु, नमूद करण्यात येते की, मोर्शी पासून जवळच असलेल्या वरुड येथे विधि व न्याय विभाग अधिसूचना दि.२६ ऑक्टोबर २०२३ नुुसार अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन झाले असून , मोर्शी तालुक्याचा त्यात समावेश आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर जिल्हयातील हलगरा येथील शेतीपंपाचा विदयुत पूरवठा खंडित केल्याबाबत

**(५०) ७११३५ (०३-०९-२०२३). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयातील हलगरा येथे पाच वर्षापुर्वी महताब येथील विदयुत पुरवठा करणारा डि.पी. जमिनदोस्त झाल्याने या डिपीवरील अनेक शेतक-यांना गावठाण डिपीवरून विदयुत पुरवठा सुरु केला असून मागील दोन महिन्यापासून महावितरणाने विजपुरठा बंद केल्यामुळे विहीरीत पाणी असूनही पिकांना पाणी मिळत नसल्यामुळे ऊस व इतर पिकांचे नुकसान झाले असून जनावरांनाही पिण्यासाठी पाणी मिळत नसल्याचे माहे जून,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बदं करण्यात आलेला विजपूरवठा त्वरीत सुरु करण्याबाबत तसेच संबंधित दोषी आढळून येणा-या महाविरणातील कर्मचारी / अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

माहे-जून, २०१८ मध्ये वादळवाऱ्यामुळे महताब येथील विद्युत पुरवठा करणारा डी.पी. जमिनदोस्त झाल्याने सदर रोहित्राचा भार गावठाण रोहित्रावरुन सुरळीत करण्यात आला होता. परंतू, सदर गावठाण (Tower) रोहित्राचे (१०० के.व्ही.ए.) दि.२९.०४.२०२३ रोजी एक फेज बंद झाल्यामुळे त्यावरील कृषी ग्राहकांचा वीज पुरवठा बंद झाला होता. सदर नादुरुस्त गावठाण रोहित्र दि. २४.०५.२०२३ रोजी बदलून गावाचा वीज पुरवठा पुर्ववत करण्यात आला आहे. या दरम्यान प्रलंबित महताब येथील रोहित्रांचे पुर्नउभारणीचे काम पूर्ण करुन घेऊन त्यावरील कृषी ग्राहकांचा वीज पुरवठा दि.२०.०६.२०२३ रोजी पूर्ववत करुन देण्यात आला आहे. महताब रोहित्राचे पुर्नउभारणीचे काम प्रगतीपथावर असल्याने सदर काम पुर्ण होईपर्यंत आठ कृषी ग्राहकांचा वीज पुरवठा बंद होता. सद्यस्थितीला महताब रोहित्रावरुन कृषी ग्राहकांचा वीज पुरवठा सुरळीत चालू आहे.

(२) कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय, निलंगा यांनी दि. २०.०६.२०२३ रोजीच्या पत्रांन्वये सदर प्रकरणाची चौकशी करण्याकरीता चौकशी समिती गठीत केली आहे. सदर चौकशी समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने दोषी आढळून आल्यास संबंधितावर महावितरणच्या नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.